RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२४० ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.२५ नोव्हेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## राहुल गांधींचं प्रकाश आंबेडकरांना पत्र; आजच्या संविधान सभेला येऊ शकत नाही, पण..पुढील प्रयत्नांसाठी माझ्या शुभेच्छा!

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक मुंबई १३**

वंचित बहुजन आघाडीतर्फे मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज पार्क मैदानावर संविधान सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेला विरोधी पक्षातील नेतेही उपस्थित असतील. या सभेचे निमंत्रण काँग्रेसचे खासदार राहुल गांधींनाही देण्यात आले. परंतु काही कारणास्तव राहुल गांधी या सभेला उपस्थित राहू शकत नाही मात्र त्यांनी प्रकाश आंबेडकर यांना पत्र पाठवून शुभेच्छा दिल्या आहेत.

राहुल गांधींनी प्रकाश आंबेडकरांना पाठवलेल्या पत्रात म्हटलंय की, संविधान सन्मान सभेचे निमंत्रण दिल्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. संविधान दिनाच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीने या मेळाव्याचे आयोजन केले त्याबद्दल तुम्हाला शुभेच्छा आहेत. गेल्या ९ वर्षापासून घटनेच्या मुलभूत अधिकारांवर सातत्याने हल्ला होत आहे. आज देशात चिंताजनक स्थिती आहे. अशावेळी संविधानाचे संरक्षण करणे ही आपल्या सगळ्यांची जबाबदारी आहे. परंतु दुर्दैवाने सध्या सुरू असलेल्या निवडणूक प्रचारामुळे मी आजच्या सभेला उपस्थित राहू शकत नाही. परंतु वंचित बहुजन आघाडीच्या पुढील प्रयत्नांसाठी माझ्या शुभेच्छा आहेत असं त्यांनी म्हटलं.



तर संविधान सन्मान सभेसाठी पाठवलेल्या निमंत्रणाला राहुल गांधींकडून उत्तर मिळाले. सध्या अन्य राज्यात सुरू असलेल्या निवडणूक प्रचारामुळे त्यांना उपस्थित राहता येत नाही. परंतु काँग्रेस पक्षाकडून पर्यायी नावे सुचवली नाहीत. तरी तुम्ही दिलेल्या प्रतिसादाबद्दल आभारी आहोत. वंचित बहुजन आघाडीकडून तुम्हाला आणि काँग्रेसला निवडणुकीत यश मिळो अशा आमच्या शुभेच्छा आहेत असं वंचितने राहुल गांधींच्या पत्रावर म्हटलं आहे.

दरम्यान, वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी राहुल गांधी यांना निमंत्रण दिले होते पण ते तेलंगणात प्रचारात असल्याने मी राहुल गांधी यांचा प्रतिनिधी म्हणून वंचितच्या सभेला उपस्थित राहणार आहे.देशाचे संविधान धोक्यात आहे. जे जे संविधान व्यवस्थेला वाचवण्यासाठी प्रयत्न करत असतील त्यांच्याबरोबर काँग्रेस राहील. म्हणूनच मी या सभेला जातोय असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले.

### राहुल गांधी तेलंगणात

काँगेस नेते राहुल गांधी आज तेलंगणा दौऱ्यावर आहेत. तेलंगणा विधानसभा निवडणुकीच्या ते प्रचारसभा घेणार आहेत. शनिवारी विशेष विमानाने राहुल गांधी यांचे आगमन नांदेड विमानतळावर झाले यावेळी माजी मंत्री अशोक चव्हाण आणि अन्य काँगेस नेत्यांनी राहुल गांधी यांचे स्वागत केले. नांदेड विमानतळावरुन हेलिकॉप्टरने राहुल गांधी आणि अशोक चव्हाण तेलंगणाला रवाना झाले. तेलंगणातील बोधन अदिलाबाद आणि अन्य ठिकाणी राहुल गांधी काँगेस उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा घेणार आहेत.

## जातीयवादी पिलावळ आरक्षण मागत आहेत पण, गोपीचंद पडळकरांची जरांगे-पाटलांवर टीका

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक जालना**

महाराष्ट्रात मराठा, ओबीसी आणि धनगर आरक्षणावरून राजकीय वातावरण तापलं आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील आरक्षणासाठी राज्यभर दौरे करत आहेत. दुसरीकडे ओबीसी नेतेही सभाचं आयोजन करत आहेत. तर, धनगर समाजही आरक्षणासाठी आंदोलन करत आहे. अशातच भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांनी मनोज जरांगे-पाटलांवर अप्रत्यक्षपणे टीका केली आहे.

जातीयवादी पिलावळ आरक्षण मागत आहे. पण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं नावही घेण्यास तयार नाही, असं म्हणत गोपीचंद पडळकरांनी जरांगे-पाटलांना लक्ष्य केलं आहे.गोपीचंद पडळकर म्हणाले, धनगर आरक्षणासाठी न्यायालय, रस्त्यावर लढाई सुरू असतानाच सरकारकडेही पाठपुरावा सुरू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात आम्हाला आरक्षण दिलं होतं.


काही पुरोगामी नेत्यांनी जातीयवादी पिलावळ तयार केल्या आहेत. ही पिलावळ आरक्षण मागत आहे. पण, ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सन्मान करत नाहीत. अथवा बाबासाहेबांचं नावंही घेण्यास तयार नाही. मात्र, यांना आरक्षण पाहिजे असं कसं चालेल? असा सवाल गोपीचंद पडळकरांनी उपस्थित केला.७० वर्षे आमच्यावर अन्याय केला गेला. अनेकजण आयएसएस, आमदार, खासदार झाले असते. पण, यापासून आम्ही मुकलो आहोत. आता आमची एकजूट झाली आहे, असं गोपीचंद पडळकरांनी म्हटलं.

यावर जरांगे-पाटील यांनीही भाष्य केलं आहे. मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नाव घेतो. ते काहाही बोलतात. त्यांनी पाहिलं नसेल, पण मी ठिकठिकाणी बाबासाहेबांच्या स्मारकाचं दर्शन घेतो. महाडला देखील मी जाऊन आलोय, असं जरांगे-पाटलांनी सांगितलं.

## नक्षलींचा पुन्हा रक्तपात, तरुणाची गोळ्या घालून हत्या महिनाभरात तीन हत्यांनी दक्षिण गडचिरोलीत दहशत

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक गडचिरोली**

पोलीस खबऱ्या असल्याच्या संशयावरून नक्षलवाद्यांनी आणखी एका तरुणाची गोळ्या झाडून हत्या केल्याने खळबळ उडाली आहे. रामजी आत्राम (२७, रा. कापेवंचा ता. अहेरी) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव असून घटनास्थळी आढळलेल्या नक्षल पत्रकात तो खबऱ्या असल्याचा दावा केला आहे. दक्षिण गडचिरोली भागात महिनाभरात नक्षलवाद्यांनी तिघांची हत्या केल्याने परिसरात दहशतीचे वातावरण आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीवरून, २४ नोव्हेंबररोजी अहेरी तालुक्यातील राजाराम खांदला पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत असलेल्या कापेवंचा येथील रहिवासी असलेला रामजी हा तरुण आपल्या शेतात काम करीत होता. दरम्यान, संध्याकाळी ५ वाजताच्या सुमारास काही सशस्त्र नक्षलवाद्यांनी त्याठिकाणी जाऊन गोळ्या झाडून त्याची हत्या केली.

पोलीस खबऱ्या असल्याच्या संशयावरून नक्षल्यांनी रामजीची हत्या केल्याचा दावा नक्षल्यांनी घटनास्थळी टाकलेल्या पत्रकात केला आहे. मात्र, तो खबरी नव्हता, असे पोलिसांचे म्हणणे आहे. याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून तपासानंतर अधिक बाबी स्पष्ट होतील, असे पोलिसांनी सांगितले आहे. महिनाभरात दक्षिण गडचिरोलीत नक्षल्यांनी तिघांची हत्या केली आहे. १५ नोव्हेंबरला भामरागड तालुक्यातील पेनगुंडा येथे दिनेश गावडे, २३ तारखेला एटापल्ली तालुक्यातील टिटोळा येथील पोलीस पाटील लालसू वेडदा आणि शुक्रवारी अहेरी तालुक्यातील कापेवंचा येथील रामजी आत्राम या तरुणाची हत्या केली. तोडगट्टा येथील खाणविरोधी आंदोलन प्रशानाकडून उधळून लावण्यात आल्यानंतर नक्षलवादी अधिकच आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे. यामुळे मागील दोन वर्षांपासून शांत बसलेले नक्षलवादी पुन्हा सक्रिय झाल्याचे चित्र असून लागोपाठ घडवून आणलेल्या हत्यासत्राने परिसरात दहशतीचे वातावरण आहे.

## कराचीमधील शॉपिंग मॉलला भीषण आग, होरपळून ९ जणांचा मृत्यू, १ जण गंभीर जखमी

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक कराची**

पाकिस्तानातील कराची मधील रशीद मिन्हास रोडवर असलेल्या आरजे मॉलमध्ये आज म्हणजेच शनिवार २५ नोव्हेंबर रोजी भीषण आग लागली. या आगीत ९ जणांचा मृत्यू झाला असून १ जण गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आलीये. कराचीतील स्थानिक रुग्णालये आणि पोलिसांनी डॉन न्यूजला दिलेल्या माहितीनुसार, रुग्णालयांमध्ये ९ मृतदेह आणण्यात आले आहेत. आठ मृतदेह जिना पोस्ट ग्रॅज्युएट मेडिकल सेंटर जेपीएमसी आणि एक मृतदेह सिव्हिल हॉस्पिटल कराची येथे आणण्यात आले. ते पुढे म्हणाले की, १८ वर्षीय जखमी मुलीला नुकतेच कराचीच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते पण उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.



या संपूर्ण घटनेचा अहवालही कराचीच्या मुख्यमंत्र्यांना सादर करण्यात आला आहे. वृत्तानुसार, जिल्हा उपायुक्त अल्ताफ शेख यांनी सांगितले की आग लागल्यानंतर २२ लोकांना मॉलमधून वाचवण्यात यश आले. दरम्यान यामध्ये जखमी झालेल्यांना जिना पोस्ट ग्रॅज्युएट मेडिकल सेंटर जेपीएमसीमध्ये हलवण्यात आले. पण यामध्ये उपचारादरम्यान एकाचा मृत्यू झाला. परिस्थिती पाहून चौथ्या मजल्यापर्यंत इमारत रिकामी करण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे.

**सकाळी ६.३० वाजता लागली आग**

शरिया फैसल स्टेशन हाऊस ऑफिसर (डक्ज) राजा तारिक मेहमूद यांनी डॉन न्यूजला दिलेल्या माहितीनुसार, ज्या इमारतीला आग लागली ती मोठी व्यावसायिक इमारत होती. इमारतीच्या आत शॉपिंग सेंटर्स, कॉल सेंटर्स आणि सॉफ्टवेअर हाऊस होते. अग्निशमन आणि बचाव विभागाच्या प्रवक्त्याने एका निवेदनात सांगितले की, त्यांना सकाळी ६:३० वाजता घटनेची माहिती मिळाली, त्यानंतर त्यांनी ८ अग्निशमन दल, दोन स्नॉर्केल्स आणि दोन बाउझर घटनास्थळी पाठवले आणि आग आटोक्यात आणण्यात आली. सिंधचे महानिरीक्षक (आयजी) रिफत मुख्तार यांनी जिल्ह्याच्या वरिष्ठ पोलिस अधीक्षकांना इमारतीत अडकलेल्या लोकांना वाचवण्याच्या सूचना दिल्या होत्या. अग्निशमन दलाला कोणतीही अडचण न होता तेथे पोहोचता यावे यासाठी रस्ता मोकळा करण्याचे आदेशही त्यांनी दिले होते.

**कराचीच्या ९० टक्के इमरतींमध्ये अग्निविरोधक सुविधा नाही**

सिंधचे कार्यवाहक मुख्यमंत्री मकबूल बकर यांनी या घटनेची दखल घेत जखमींना तातडीने वैद्यकीय मदत देण्याचे निर्देश दिले आहेत. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या मृत्यूबद्दल त्यांनी शोक व्यक्त केला. अडकलेल्यांना सुखरूप बाहेर काढण्याचे निर्देश त्यांनी महापालिका आयुक्तांना दिले. जीवित आणि मालमत्तेची जबाबदारी सरकारची आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. दरम्यान या आठवड्याच्या सुरुवातीला सरकारने महत्त्वाच्या शहरांमधील इमारींमध्ये तपासणी केली असता, शहराच्या जवळपास ९० टक्के इमारतींमध्ये अग्निविरोधक सुविधा नसल्याचे समोर आले आहे.

## कडक पोलीस बंदोबस्तात रविकांत तुपकर पोलिसांच्या ताब्यात

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक बुलढाणा**

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांना आज दुपारी कडक पोलीस बंदोबस्तात त्यांच्या राहत्या घरातून पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांना बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात आणण्यात आले आहे. ठाणेदार प्रल्हाद काटकर यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. शनिवारी दुपारी चिखली मार्गावरील तुपकर यांच्या



निवासस्थान परीसरातील हालचाली वाढल्या. यानंतर पोलिसांचे एक पथक तिथे दाखल झाले. यावेळी तुपकर व अधिकाऱ्यात शाब्दिक चकमकी उडाल्या. यानंतर त्यांना शहर पोलीस ठाण्यात आणण्यात आले.शहरात देखील बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. यापूर्वी सोयाबीन-कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या न्याय हक्काच्या मागण्यांसाठी तुपकर यांनी बुलढाण्यातील एल्गार मोर्च्यात थेट मंत्रालयाचा ताबा घेण्याचा गंभीर इशारा दिला होता. यावरून पोलिसांनी तुपकरांना नोटीस बजावली. मुंबईत आंदोलन करू नये अन्यथा कारवाई केली जाईल असे नोटीसमध्ये नमूद आहे.

## राज्यातील या २५ जिल्ह्यांना यलो अलर्ट पुन्हा अवकाळी पावसाचे वातावरण

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राज्यात पुन्हा एकदा अवकाळी पावसाचे वातावरण तयार झाले आहे. येत्या तीन-चार दिवसांत महाराष्ट्राच्या काही भागात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच शनिवारी राज्यातील २५ जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली असून या जिल्ह्यांना यलो अलर्ट दिला आहे.

राज्यातील ठाणे, पालघर, मुंबई, रायगड आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसाठी २५, २६, २७ व २८ नोव्हेंबरला यलो अलर्ट जारी केला आहे. तर पश्चिम महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना आणि धाराशिव या




जिल्ह्यांना देखील यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.य़ासोबतच विदर्भात बुलढाणा, अकोला, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम आणि यवतमाळ आणि उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, नंदुरबार आणि धुळे या जिल्ह्यांना देखील यलो अलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळे राज्यात मोठ्या पावसाची शक्यता आहे.

## महापरिनिर्वाण दिनाच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वे चा मोठा निर्णय; १४ अतिरिक्त गाड्या चालवणार

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यभरातून येणाऱ्या प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वे १४ अनारक्षित विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. ही माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केली आहे.

बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिवस ६ डिसेंबर २०२३ रोजी आहे. यासाठी ३ विशेष नागपूर ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई, ६ विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई, दादर ते सेवाग्राम, अजनी, नागपूर, २ विशेष कलबुरगी आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई दरम्यान, २ विशेष सोलापूर ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई दरम्यान आणि १ विशेष अजनी ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई अशा विशेष रेल्वे गाड्या चालविण्यात येणार आहे. यामुळे राज्यभरातून मुंबईत दाखल होणाऱ्या बौद्ध अनुयायाना मोठा दिलासा मिळणार आहे.



**या आहेत विशेष गाड्या**

मध्ये रेल्वेकडून सोडण्यात येणाऱ्या विशेष रेल्वे गाड्यांमध्ये नागपूर- मुंबई अनारक्षित तीन विशेष गाड्या. यापैकी विशेष ट्रेन क्रमांक ०१२६२ नागपूर येथून ४ डिसेंबर रोजी ११ वाजून ५५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी साडेतीन वाजता पोहोचेल. दुसरी विशेष ट्रेन क्रमांक ०१२६४ ही पाच डिसेंबर रोजी नागपूर येथून ८ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे त्याच दिवशी ११ वाजून ४५ वाजता पोहोचेल. तिसरी विशेष रेल्वे गाडी क्रमांक ०१२६६ पाच डिसेंबर रोजी नागपूर येथून तीन वाजून ५० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी १० वाजून ५५ वाजता पोहोचेल.

**असे असणार या रेल्वे गाड्यांचे थांबे**

विशेष रेल्वे गाड्या या नागपूर, अजनी, सेवाग्राम, वर्धा, पुलगाव, धामणगाव, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, जलंब, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कसारा, कल्याण, दादर आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई असे असणार आहेत.

संपादकीय ......

# रोहित शर्मांचे कौतुक करावे तितके कमीच

१९ नोव्हेंबर रोजी अहमदाबादच्या रणांगणात ऑस्ट्रेलियाकडून पराभव झाल्याचं वाईट वाटलेच. पण तुम्ही विश्वचषकात केलेल्या कामगिरीचा अभिमानही आहे. खेळात जय – पराजय असतोच... तुम्ही हरल्याने अनेकांचे ह्दय तुटले.. लहानग्यांनी टाहो फोडला. काहींनी तर टीम इंडियाच्या शिलेदारांना शिव्या वैगरे दिल्या. काहींनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला. एक चाहता म्हणून विजयात तुमच्या जितका पाठिशी आहे, तितकाच पराभवात तुमच्या सोबत आहे.

टीम इंडिया, तुम्ही ४८ दिवस सर्व भारतीयांना जल्लोष करण्याची संधी दिली. तुम्ही कोट्यवधी भारतीयांच्या आपेक्षांचं ओझं घेऊन खेळलात. हे खरेच कौतुकास्पद आहे. सलग १० सामने जिंकले, पण अखेरच्या सामन्यात पराभव झाला. तो दिवस आपला नव्हताच. ऑस्ट्रेलिया चॅम्पियनसारखा खेळला, त्यामुळे जिंकला. प्रत्येक क्षेत्रात त्या दिवशी ऑस्ट्रेलिया सरस होता. नाणेफेकही त्यांच्याच बाजूने पडली होती. तुम्ही प्रयत्न केले.. पण पदरी निराशा आल्याने अनेकांचे मन तुटले.

हरणे, जिंकणे याहीपलिकडे जर कोणती भावना असेल तर ती असते लढणे! तुम्ही त्याला खरे उतरलात. चार वर्षांचं तुमचं कष्ट चषकात आले नाही, पण कोट्यवधी लोकांना तुम्ही आनंदोत्सव करण्याची संधी दिली. फायनलमध्ये पोहोचण्याचा प्रवास तसा सोपा नव्हताच. पहिल्या सामन्यापासून तुम्ही वर्चस्व गाजवले. आपल्या टीमची तुलना १९७५ मधील ऑस्ट्रेलिया संघासोबत केली गेली. यातच तुमचे यश होय. एक दिवस खराब गेला म्हणून तुम्ही खराब नाहीत खेळलात. २०२३ विश्वचषकातील तुमच्या कामगिरीचं कौतुकचं आहे.

रोहित शर्मांचे कौतुक करावे तितके कमीच आहे. सेनापतीलाही लाजवेल असे नेतृत्व केलेय. पहिल्या चेंडूपासून प्रतिस्पर्धी गोलंदाजावर तुटून पडायचा. रोहितच्या वादळात प्रतिस्पर्धी संघ नेस्तनाभूत व्हायचा. फक्त फलंदाजीत नाही.. तर कर्णधार म्हणून तो आपल्या प्रत्येक खेळाडूच्या पाठीशी उभा राहिला. प्रत्येकाला आत्मविश्वास दिला... लढण्याची जिद्द दिली. एखादा कर्णधार कसा असावा.... हे त्याने सगळ्या जगाला दाखवून दिले. आपल्या माईलस्टोनपेक्षा त्याने संघाच्या हिताला लक्ष दिले. रोहितशिवाय विराट कोहलीचेही कौतुक करावे तितके कमीच... चौथा वर्ल्ड कप खेळणाऱ्या विराट कोहलीने आपला सगळा अनुभव पणाला लावला. प्रत्येक सामन्यात संघाची ढाल म्हणून उभा राहिला. नवख्या खेळाडूंना घेऊन भारताच्या विजयावर अनेकदा शिक्कामोर्तब केले. सचिनच्या समोरच सचिनचा विक्रम मोडणं, हे तर स्वप्नवतच होते. विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी टीम इंडियाला लढण्याची जिद्द दिली. या दोन्ही लढावय्यांना मानाजा मुजरा...

पहिलाच वर्ल्डकप खेळणारे श्रेयस अय्यर आणि शुभमन गिल यांनीही सर्वांच्या डोळ्याचे पारणे फेडले. डेंग्यूमुळे सुरुवातीच्या सामन्याला मुकणाऱ्या गिलने पुन्हा प्रभावी कामगिरी केली. पण त्याच्याकडून खूप मोठ्या अपेक्षा होत्या. त्या राहिल्याच. श्रेयस अय्यरला पहिल्या तीन चार सामन्यात टीकांचा सामना करावा लागला. पण बॉऊन्स चेंडूला ज्याप्रमाणे टोलवले, तसेच त्याने लोकांच्या टीकेला टोलवले. अय्यर आणि गिल यांनी फायनलमध्ये घाई केली... पण ठिकाय, नवखे आहेत, चुका होतात. पण भारतीय क्रिकेटचे हे भविष्य आहे. त्यांचं खूप क्रिकेट शिल्लक आहे. यापुढे ते जबाबदारीने खेळतील.

केएल राहुल हा टीम इंडियातला अनसंग हिरो राहिलाय. त्याने प्रत्येक क्षेत्रात योगदान दिले. फलंदाजीवेळी संघाला गरज होत्या, तशा धावा काढल्या. विकेटच्या मागे रेग्युलर विकेटकीपरला लाजवेल अशी कामगिरी केली. डीआरएसमध्येही त्याने मोलाचे योगदान दिले. केएल राहुल वनडे फॉर्मॅटचे स्पेशल पॅकेज आहे.

जड्डू... फलंदाजी, गोलंदाजी आणि फिल्डिंगमध्ये अप्रतिम कामगिरी केली. हार्दिकच्या अनुपस्थितीत रवींद्र जाडेजाने अष्टपैलू खेळाडूची कमी भासू दिली नाही. जाडेजाने संपूर्ण स्पर्धेत शानदार कामगिरी केली. सिराजला तितके यश मिळाले नाही, पण त्याच्या प्रयत्नांना शंभर १०० गुण मिळतील. त्याने जिवाचे रान करुन गोलंदाजी केली.

बुमराह आणि शामीबद्दल काय बोलायचे.. त्यांच्या कामगिरीबद्दल प्रतिस्पर्धी संघांना विचारा... बुमराहचा चेंडू न सुटलेले कोडे होते. यंदाच्या विश्वचषकात बुमराहने ७० टक्के चेंडू निर्धाव फेकलेत. त्यावरुनच त्याच्या गोलंदाजाची दहशत दिसतेय. शामीनेही संधी मिळाल्यानंतर कहर केला. एक एक दांड्या उखडून टाकल्या. शामी विश्वचषकाच्या इतिहासातील भारताचा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरलाय. फायनलमध्ये शामीला थोडा मार बसला... पण चलता है बॉस.. एका सामन्यामुळे नावे ठेवण्यात अर्थ नाही. जिवाचे रान करुन तू खेळलास.. हे महत्वाचे आहे.

कुलदीप यादव... भारताच्या फिरकीची धुरा एका खांद्यावर संभाळली. आपल्या फिरकीच्या जाळ्यात अनेकांना अडकवले. गोलंदाजीची कमी संधी मिळाली.. पण त्याने आपले काम चोख बजावले. शार्दूल, ईशान आणि अश्विन अण्णा यांनीही आपापले काम यशस्वी पूर्ण केले. सर्वात महत्वाचे सपोर्ट स्टाप आणि राहुल द्रविड.. यांनी संघाची शानदार बांधणी केली.

भारताने विश्वचषकावर नाव कोरायला हवं होतं. पण ठिकाय, पराभव होतोच.. वर्ल्डकप जिंकला नाही, म्हणून आम्ही पाठिंबा द्यायचा थांबवणार नाही. १४० कोटी भारतीयांच्या अपेक्षांचे ओझं घेऊन जाणं, ही सोपी गोष्ट नाही. तुम्ही देशासाठी जिवाचे रान केलेत, ही मोठी गोष्ट आहे. विश्वचषक येतील, जातील.. पण या संघाचा लढवय्यापणा कधीच कुणी विसरणार नाही.

# व्यापारी संकुलाच्या सोयीसाठी नालाच बुजविला

## भाजप पदाधिकारी पालिकेवर धडकले



**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** व्यापारी संकुल उभारण्यास सोयीचे जावे म्हणून संबंधित व्यावसायिकाने शहरातून वाहणारा सांडपाण्याचा नालाच बुजविल्याने शहरातील नाल्याच्या काठी ठिकठिकाणी घाण साचली आहे. परिणामी नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याने भाजपा शहर मंडळाच्या पदाधिकार्यांनी गुरूवारी नगरपालिकेवर धडक देत मुख्याधिकार्यांना याबाबत अवगत केले.

गुरूवार २३ नोव्हेंबर रोजी अचलपूर शहर मंडळाच्या पदाधिकार्यांनी नगरपरिषदेवर धडक देऊन मुख्याधिकारी धीरज गोहाड यांना सांडपाण्याच्या नाल्यासह विविध समस्यांचे निवेदन दिले. विदर्भ मिल परिसरातील विवेकानंद कॉलनी, एकता नगर व अमरावती रोड याला लागून मोठा नाला कॉटन मार्केट, कृषी उत्पन्न बाजार समितीपासून सुरू होत असून मोती मंगल कार्यालय समोरून विवेकानंद कॉलनीच्या परिसरामध्ये जाऊन बंद झालेला आहे. पुढे एक मोठ्या स्वरूपाचे व्यापारी संकुलांचे बांधकाम सुरू असल्यामुळे व त्याचे साहित्य पडलेले असल्याने नाल्यातील पाणी पुढे जात नाही. बांधकामाच्या साहित्यामुळे हा नाला तेथे बुजलेला आहे. याची तक्रार नगरपरिषदेमध्ये अनेकदा करून सुद्धा दुर्लक्ष केले आहे.

शेवटी गुरूवारी भारतीय जनता पार्टी अचलपूर शहर अध्यक्ष कुंदन यादव तसेच भाजपाचे गजानन कोल्हे, मनोज जामनेरकर, माजी नगरसेवक शंकर भाषानी, प्रफुल्ल कुर्हेकर, ललित ठाकूर, भूषण हिरुळक, ललित चंदनकर, मनीष समुंद, नीलेश नागापुरे व इतर कार्यकर्त्यांनी जाऊन थेट मुख्याधिकारी धीरज गोहाड यांच्याशी चर्चा केली. यावेळी शिष्टमंडळाने आठ दिवसात ही समस्या निकाली काढण्याचे आवाहन केले. त्याच प्रकारे विदर्भ मिल चौकामध्ये गेल्या तीन वर्षापासून जुनी चाळ येथून नारायणपूर चौकापर्यंत स्ट्रीट लाईट कायमस्वरूपी बंद पडलेले असल्याने त्यासाठीही विनंती करण्यात आली. या परिसरामध्ये सातत्याने पिण्याच्या पाण्याची अडचण नेहमीप्रमाणे अजूनही सुरूच असल्याने या विषयावर सुद्धा समस्या सांगितली. मुख्याधिकार्यांनी पंधरा दिवसाच्या आत सर्व सांगितलेली कामे पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

# शेतकऱ्यांना १,०१९ कोटी द्या, अन्यथा कारवाईस तयार राहा

## कृषी विभागाचा विमा कंपन्यांना इशारा

### निम्मीच अग्रीम भरपाई जमा

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक पुणे – :** पंतप्रधान खरीप पीक विमा योजनेत राज्यातील २४ जिल्ह्यांमध्ये सुमारे ४५ लाख शेतकऱ्यांना २ हजार ५५ कोटी रुपयांची २५ टक्के अग्रीम नुकसानभरपाई रक्कम देण्याचे ठरले. ही रक्कम दिवाळीपूर्वीच देण्याचे आदेश असताना विमा कंपन्यांनी केवळ १ हजार ३६ कोटी रुपये शेतकऱ्यांना दिले आहेत. अजूनही १ हजार १९ कोटी रुपयांची नुकसानभरपाई न दिल्याने कृषी विभाग आक्रमक झाला आहे. येत्या तीन



दिवसांत ही रक्कम न दिल्यास कारवाई करू, असा दम विमा कंपन्यांना दिला आहे.

ऑगस्टमध्ये २४ जिल्ह्यांत पावसाचा खंड २१ दिवस किंवा त्यापेक्षा जास्त झाला होता. परिणामी, पिकांच्या संभाव्य उत्पादनात ५० टक्क्यांपेक्षा जास्त घट दिसून आली.

### तरीही कंपन्यांचा हात आखडता

कृषी आयुक्त प्रवीण गेडाम यांनी गुरुवारी सर्व विमा कंपन्यांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन ही रक्कम तातडीने अदा करण्याचे आदेश दिले.

ही रक्कम येत्या तीन दिवसांत न दिल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा विस्तार व प्रशिक्षण संचालक दिलीप झेंडे यांनी सर्व विमा कंपन्यांना पत्राद्वारे दिला आहे. अग्रीमची रक्कम केवळ दोन हजार ५५ कोटी रुपये असूनही विमा कंपन्यांनी देण्यात आखडता हात घेतला आहे.

अजूनही हिंगोली, सातारा, सोलापूर, नगर, जळगाव, नाशिक, चंद्रपूर या जिल्ह्यांमधील काही पिकांसंदर्भात विमा कंपन्यांचे आक्षेप विविध स्तरांवर प्रलंबित आहेत.

### २३ लाख २ हजार ६४७ शेतकरी वंचित

कृषी विभागाच्या अहवालानंतर विमा कंपन्यांकडून नुकसानभरपाईच्या २५ टक्के अग्रीम रक्कम देण्याचे आदेश राज्य सरकारने दिले.

नुकसानभरपाईत २५ जिल्ह्यांमध्ये ४५ लाख ७७ हजार ६६२ शेतकऱ्यांना सुमारे २ हजार ५५ कोटी ९० लाख ९६ हजार रुपयांची रक्कम देण्याचे ठरले.

रक्कम दिवाळीपूर्वी देण्यासाठी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी प्रयत्न केले. दिवाळीच्या दरम्यान ही रक्कम मिळण्यास सुरुवात झाली.

केवळ ५० टक्के शेतकऱ्यांनाच ही रक्कम मिळाली असून २३ लाख २ हजार ६४७ शेतकऱ्यांना १ हजार ३६ कोटी ७९ लाख ९० हजार रुपये देण्यात आले. अजूनही १ हजार १९ कोटी ११ लाख रुपयांची रक्कम प्रलंबित आहे.




## चालणे की धावणे? आरोग्यासाठी जास्त काय फायदेशीर?

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक –** आपल्याला जर नेहमी निरोगी राहायचं असेल तर त्यासाठी व्यायाम करण्याची गरज आहे. चांगला आहार घेण्याची गरज आहे. अनेकदा आरोग्य तज्ज्ञ आपल्याला शारिरीक हालचाली करण्यास सांगतात. यासाठी तुम्ही जर सर्वात सोप्या व्यायामाचा विचार केला तर चालणे आणि धावणे हे व्यायाम सर्वात आधी डोळ्यांसमोर येतात. नियमित



धावणे किंवा चालणे याद्वारे तुम्ही स्वतःला तंदुरुस्त आणि निरोगी ठेवू शकता. पण जेव्हा या दोघांमध्ये शरीरासाठी नेमकं चांगलं काय याचा विचार केला जातो तेव्हा लोक गोंधळतात. या ठिकाणी आम्ही तुम्हाला फिटनेसच्या दृष्टीने दोन्ही व्यायाम सर्वोत्तम आहेत. मात्र, त्यांचे आरोग्यावर वेगवेगळे परिणाम होतात ते कसे? चालणे आणि धावण्याचे आरोग्यदायी फायदे काय आहेत? या संदर्भात अधिक माहिती सांगणार आहोत.

**चालण्याचे फायदे**

आरोग्य तंदुरुस्त ठेवण्यासाठी चालणे चांगले आहे. यामुळे तुमचे शरीर सक्रिय राहते आणि अन्नाचे पचन व्यवस्थित होते. ज्यांना मधुमेह आहे त्यांनी रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी सतत चालावे. ताणतणाव, चिंता, झोप न लागणे, एकाग्रता नसणे इत्यादी गोष्टी यामुळे दूर होतात. आजारी आणि वृद्ध व्यक्ती जे जास्त व्यायाम करू शकत नाहीत त्यांना चालण्यामुळे आरोग्यदायी फायदे मिळू शकतात. चालण्याचा एक फायदा म्हणजे हा व्यायाम तुम्ही कोणत्याही वयात करू शकता. चालण्याने रक्तदाबही नियंत्रित राहतो आणि डोळ्यांसाठीही फायदेशीर असल्याचे सांगितले जाते.

**धावण्याचे फायदे** – चालण्याप्रमाणेच धावण्याचेही अनेक फायदे आहेत. सध्या जगभरात लठ्ठपणाचे प्रमाण फारच वाढत चालले आहे. अशा वेळी वजन कमी करण्यासाठी धावणे हा सर्वोत्तम पर्याय मानला जातो.

धावण्याने भरपूर कॅलरी आणि फॅट बर्न होते आणि त्यामुळे लठ्ठपणा कमी होतो. तर, धावण्याने शरीरातील रक्ताभिसरण वाढते आणि स्नायू मजबूत होतात. हृदय निरोगी ठेवण्यासाठी धावणे हा एक चांगला व्यायाम असल्याचे सिद्ध होते. यासाठी चालणे आणि धावणे हे दोन्ही व्यायाम आरोग्याच्या दृष्टीने फायद्याचेच आहेत. मात्र, तुम्ही तुमच्या सोयीनुसार योग्य व्यायम पद्धत निवडणं गरजेचं आहे.

# ऋषीकेश शर्मा अमरावती शहर भाजप राजस्थानी सेलचे अध्यक्ष

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** भाजप पक्ष महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात समाजातील प्रत्येक घटकाच्या माध्यमातून जनतेच्या सेवेत पुढे जात आहे. अमरावती शहरातही भारतीय जनता पक्षाच्या संघटनाची जबाबदारी पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष म्हणून माजी पालकमंत्री आमदार प्रवीण पोटे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. अमरावती शहरातील राजस्थानी समाज भारतीय जनता पक्षाशी संबंधित आहे. राजस्थानी समाजातील तरुणांना महत्त्वाचा सामाजिक घटक म्हणून संघटनेत समाविष्ट केले जात आहे. आमदार प्रवीण पोटे पाटील यांची भाजप राजस्थानी सेलच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे, सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणारे ऋषिकेश शर्मा हे व्यवसायाने पत्रकार संपादक असून याआधी त्यांनी भारतीय जनता युवा मोर्चामध्ये उपाध्यक्ष म्हणूनही काम पाहिले आहे. हृषिकेश शर्मा यांचे समाजातील प्रत्येक घटकाशी संबंध असून सर्वांना न्याय मिळवून देण्यातही ते अग्रेसर आहेत. आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी सामाजिक चिंतेबरोबरच तरुणांना राजकारणात आणण्याच्या हालचाली सुरू केल्याचे दिसून येत आहे. पोटे पाटील यांनी जाहीर केलेल्या निवडीबद्दल हृषीकेश शर्मा यांचे समाजातील मान्यवरांकडून सर्वत्र अभिनंदन होत आहे.





# शिरखेड पोलिसांनी अवैध गोवंश वाहतुकीवर कारवाई

## ५४ गोवंशांची मुक्तता

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी–** शिरखेड पोलिसांनी अवैध गोवंश वाहतुकीवर कारवाई करत तब्बल ५४ गोवंशाचा जीव वाचवला. त्या गोवंशाला केकतपूर गोशाळेत हलविण्यात आले. २४ नोव्हेंबर रोजी सकाळच्या सुमारास मोर्शी अमरावती मार्गावरील गोराळा येथे ही कारवाई करण्यात आली. तेथून अल्लाउददीन रज्जाक खान (३९, बडी होली सारंगपूर, मध्यप्रदेश), उस्मान खान मजित खान (३०, मुखेलवाडी, मध्यप्रदेश) व बादशाह खान खुदाबक्ष खान (३३, रा. पल्ला, हरियाणा) यांना अटक करण्यात आली.

शिरखेड पोलीस पथक शुक्रवारी सकाळी आठ ते नऊच्या दरम्यान गोराळाजवळ पेट्रोलिंग करीत असतांना त्यांनी मध्यप्रदेशातून येत असलेल्या ट्रकची पाहणी केली.

ट्रकमध्ये लाकडी पाटयांच्या सहाय्याने दोन कप्पे तयार करुन त्यात ती जनावरे कोंबली होती. ती कत्तलीकरिता नेण्यात येत होती. ती सुमारे ८.५५ लाख रुपये किमतीचे जनावरे व १६ लाख रुपये किमतीचा ट्रक असा २४.५५ लाख रुपयांचा माल पोलिसांनी जप्त केला. ट्रकमालकाचा शोध सुरू आहे.

पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश पांडे यांच्या मार्गदर्शनात शिरखेडचे ठाणेदार सुरज तेलगोटे, अंमलदार संजय वाघमारे, नितेश वाघ, गजानन तिजारे, शेख शकुर, चालक अरुण श्रीनाथ यांनी ही कारवाई केली.

दै.विदर्भ प्रजासत्ताक अंक निःशुल्क पाहिजे असल्यास आम्हाला तुमच्या नावासह टेक्स मेसेज किंवा व्हाट्सअप करा आमचा मो.नंबर ८६२४९८५६३३ संपर्क करा.

# चांदुर बाजार पंचायत समिती झाले बेवारस

## वचक नसल्याने पंचायत समीती कर्मचार्यांचा मनमानी कारभार

### दौऱ्याचे कारणे दाखवून ४५ पैकी १५ कर्मचारी गैरहजर





(सुयोग गोरले)

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार**

चांदूरबाजार पंचायत समीती मधील प्रशासनावर कोणत्याही वरीष्ठ अधिकार्यांचा वचक नसल्याने सर्वत्र मनमानी कारभार सुरु आहे.शुक्रवारी सकाळी १०.२० ला सदर प्रतिनिधीने कार्यालयात फेरफटका मारला असता या कार्यालयातील गटविकास अधिकारी वगळता इतर विभागातील बहुतेक अधिकारी व कर्मचारी त्यांच्या विभागात हजरच नव्हते.पंचायत समीती कार्यालयात विविध विभागात ४५ कर्मचारी कार्यरत असल्याची कार्यालयात नोंद असतांना यातील तब्बल विविध विभागातील १५ अधिकारी व कर्मचारी गैरहजर असल्याचे स्पष्ट झाले.तर इतर काही अधिकारी दौरा दाखवून गैरहजर असल्याची माहीती मिळाली.येथील बांधकाम विभागात दोन शाखा अभियंता कार्यरत आहेत.हे नेहमीच कार्यालयात दौरा दाखवुन गैरहजर असतात.यातील एक जि.प. स्तरावर वेतन व भत्ते विभागातही सेवा देत असल्याची माहीती मिळाली.बांधकाम अभियंता कंत्राटदारांचे बिल काढण्यासाठी च कार्यालयात येतात काय? असाही प्रश्न या निमीत्ताने विचारला जात आहे.शासकिय कार्यालयात हजर राहण्याच्या वेळे नंतर येणे व कार्यालय संपण्याच्या वेळेपुर्वी कार्यालय सोडण्याचे प्रकार या कार्यालयात नित्याचे झाल्यामुळे येथील अधिकारी व कर्मचार्यांना जि,प. मुख्य कार्यपालन अधिकार्यांचाही धाक राहिला नसल्याचे आजच्या स्ट्रींग वरुन दिसून येते. पंचायत समीती हा शासनाच्या विविध योजना व उपक्रम ग्रामीण भागात पोहोचवण्याचा महत्वाचा दुवा आहे.घरकुल बांधकाम,रोजगार हमी योजना,स्वच्छ भारत मिशन,ग्रामीण शेतकर्यांना कृषी मार्गदर्शन व साहित्य पुरविणे, आरोग्य सेवा,शिक्षण यासारख्या विभागातुन शासनाच्या योजना पंचायत समीतीस्तरावर सेवा पुरविणे पंचायत समीती स्तरावर ग्रामीणांना पुरविल्या जातात. यासाठी चांदूरबाजार पंचायत समीती कार्यालयात ४५ अधिकारी,कर्मचारी कार्यरत आहेत.शासनाने पाच दिवसाचा आठवडा जाहीर केला.त्यामुळे अधिकारी व कर्मचार्यांना शासकिय नियमानुसार सकाळी ९.४५ वा.हजर राहणे व साय.६.१५ वा.कार्यालय सोडणे बंधनकारक करण्यात आले.यासाठी जि.प.मुख्य कार्यपालन अधिकारी अविश्यांत पंड्या यांनी तसे पत्र देऊन सर्व कर्मचार्यांना ताकीदही दिली.मात्र त्याचे पालन चांदूरबाजार पंचायत समीतीत होत नसल्याचे दिसून येते. या कार्यालयात कृषी अधिकारी एक, बांधकाम शाखा अभियंता दोन,सहा.प्रशासन अधिकारी एक,सहाय्यक लेखाधिकारी एक,कनिष्ठ लेखाधिकारी एक,क.प्रशासन अधिकारी दोन,विस्तार अधिकारी आरोग्य व कृषी आठ,स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक दोन, वरीष्ठ सहाय्यक पाच,वरीष्ठ सहा. लेखा एक,कनिष्ठ सहाय्य क बारा,कनिष्ठ सहा. लेखा एक,आरोग्य सेवक एक, वाहन चालक एक,परिचारक चार, पशुपर्यवेक्षक एक असे ४५ कर्मचारी कार्यरत आहेत. यातील एक जि.प. मध्ये सेवा देत असुन एक आयुक्त कार्यालयात सेवा देत असल्याची लेखी माहीती मिळाली,तर १५ कर्मचारी आपल्या विभागात गैरहजर असल्याचे स्पष्ट झाले. आपल्या विभागात गैरहजर असलेल्या कर्मचार्यात शाखा अभियंता बांधकाम प्रकाश चव्हाण, राजेशअडगोकार, सहा.लेखाधिकारी उज्वला खांडेकर, क.लेखाधिकारी पुरुषोत्तम पवार,क.सहाय्यक दिपा मोहणे,मंगेश सावरकर, अनुराग हिरुळकर,सीमा चवरे, तांत्रिक अधिकारी म.ग्रा.रो.ह. यो.कक्ष आदर्श पाटील,किशोर भिवागडे, मंगेश वानखडे, अमोल धोटे,अमोल बिलवे, समुह समन्वयक स्वच्छ भारत मिशन स्वाती धरपाळ,आकाश उके या १५ कर्मचार्यांचा समावेश आहे.

### दौरा दाखवुन गैरहजर राहण्याचे प्रकार वाढले

कार्यालयात हजर राहण्याची वेळ स.९.४५ ते सायं. ६.१५ असतांना सदरचे कर्मचार्यांपैकी काही कर्मचारी २४ नोव्हे.रोजी गैरहजर राहिले तर काही पुर्व परवानगी न घेता व दौरा नोंद न करता कार्यालयात गैरहजर असल्याचे आढळून आले.याचा खुलासा तीन दिवसाचे आत न दिल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्याचे पत्र संबंधीत कर्मचार्यांना देण्यात येणार आहे–

**–मोहन श्रृंगारे** गटविकास अधिकारी पं.स.चांदूरबाजार–

# पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील महापालिकेत येताच बाकी नागरिक बाहेर ....

## प्रवेशद्वारावर कडक पोलीस बंदोबस्त



**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी अमरावती महापालिकेत आढावा बैठक घेतली. उद्या शनिवार, परवा रविवार व त्यानंतर सोमवारी गुरुनानक जयंतीची सुट्टी असल्याने सामान्य जनतेच्या कामांच्या दृष्टीने आजचा दिवस महत्त्वाचा होता. त्यामुळे शहराच्या कानाकोपऱ्यातून नागरिक आपली कामे घेऊन महापालिकेत आले होते.

मात्र पालकमंत्र्यांची बैठक असल्याचे कारण देऊन पोलीस प्रशासनाने संपूर्ण महापालिकेचा परिसर निर्मनुष्य केला व पायपीट करत महापालिकेत आलेल्या सामान्य नागरिकांना महापालिका आवाराच्या बाहेर काढत प्रवेशद्वार बंद करून घेतले.

यावेळी प्रवेशद्वारावर कडक पोलीस बंदोबस्त होता. नागरिकांना आत जाण्यास मज्जाव करण्यात आला. यापूर्वी सुद्धा अनेक पालकमंत्र्यांच्या बैठकी महापालिकेत झाल्या. मात्र सामान्य जनतेशी असा व्यवहार आजपर्यंत कुणी केला नाही, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.

# तरवली सराटी दगडफेक प्रकरणात पहिली अटक



**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक जालना** – दोन महिन्यांपूर्वी अंतरवली सराटीमध्ये दगडफेक आणि जाळपोळ झाली होती. या प्रकरणात पोलिसांनी पहिली अटक केली आहे. ऋषीकेश बेदरे या मुख्य आरोपीला पोलिसांनी अटक केली. जालना स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली. काल सायंकाळी ६ ते ७ वाजण्याच्या सुमारास ही अटक करण्यात आली. मनोज जरांगे पाटील आमरण उपोषणाला बसले होते. त्यावेळी तिथे पोलिसांनी लाठीचार्ज केला. त्यानंतर हे प्रकरण तापलं. याचवेळी पोलिसांवर सुद्धा दगडफेक झाली होती. या प्रकरणात पोलिसांनी आता कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. ऋषीकेश बेदरे आणि त्याच्या ३ सहकाऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी ऋषीकेशकडून पिस्तुल आणि जिवंत काडतूस जप्त केली आहेत. अंबड पोलीस ठाण्याच्या लॉकअपमध्ये आरोपींचा मुक्काम आहे. अंबड पोलीस ठाण्याबाहेर पोलिसांचा तगडा बंदोबस्त आहे. आज सकाळी ११ वाजता अंबड अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात आरोपीला हजर करण्यात येणार आहे. त्यावेळी आरोपींना जामीन मिळतो कि, पोलीस कोठडी हे समजेल. जामीन मिळण्याची शक्यता कमी आहे. कारण ३०७ सारख गंभीर कलम लावण्यात आलं आहे. अतरावली सराटीमध्ये झालेल्या दगडफेकीत पोलीस आणि ग्रामस्थ जखमी झाले होते. धुळे–सोलापूर महामार्गा वर प्रचंड जाळपोळ करण्यात आली होती. अतरवली–सराटीमध्ये जे घडलं. ते गुन्हे रद्द करण्यात यावेत अशी मागणी करण्यात येत होती. पण आता पोलिसांनी आक्रमक पाऊल उचललं आहे.

# ‘बम बम भोले आणि राऊतसाहेब बोले’

## चित्रा वाघ यांची संजय राऊतांवर खोचक टीका



**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई :–** मध्य प्रदेशमधील निवडणूक प्रचारात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी प्रत्यक्ष नाव न घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उल्लेख ‘पनवती’ केला होता. त्यासंदर्भात बोलताना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी शुक्रवारी, या देशाला २०१४पासून लागलेली पनवती २०२४ला दूर होणार आहे, अशी टीका केली. त्यावर भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे.

चित्रा वाघ म्हणाल्या की, दुसऱ्यांसाठी पनवतीची अपेक्षा करताना स्वत:ची केवढी अवनती करून घेतली आहे? बनारसला जायचे की नाही ते आम्ही ठरवूच; पण तुमचा मुक्काम हल्ली बनारसच्या अस्सी घाटावरच असतो असे तुमचे नशाबाज वर्तन पाहून वाटते. तिथल्या फेमस बनारसी पुडीच्या धुंदीमुळे तुमचे एकंदर ताळतंत्र सुटल्यासारखे दिसत आहे. ‘बम बम भोले आणि राऊतसाहेब बोले’, असे काही झाले आहे का? असा प्रश्न विचारून काळजी घेण्याचा सल्लाही त्यांनी दिला आहे.

# ‘एमपीएससी’ आणि ‘पीडब्लूडी’ची परीक्षा एकाच दिवशी! उमेदवारांचा उडणार गोंधळ




**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने महाराष्ट्र अराजपत्रित गट–ब व गट– क सेवा संयुक्त मुख्य परीक्षा १७ डिसेंबरला होणार आहे. याच दिवशी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या स्थापत्य अभियांत्रिकी पदाची परीक्षाही होणार आहे. या दोन्ही परीक्षांसाठी अनेक उमेदवारांनी अर्ज केला असल्याने गोंधळ निर्माण झाला आहे. एकाच दिवशी परीक्षा झाल्यास अनेक विद्यार्थ्यांना कुठल्याही एक परीक्षेला मुकावे लागणार असल्याने तारखेत बदलाची मागणी होत आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने अराजपत्रित गट–ब व गट– क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेचा निकाल १२ सप्टेंबरला जाहीर करण्यात आला. या परीक्षेत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांनी १७ डिसेंबरला होणाऱ्या मुख्य परीक्षेसाठी अर्जही केले. आता याच तारखेला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या स्थापत्य अभियांत्रिकी पदाची परीक्षा होणार आहे. दोन्ही परीक्षांचा दिवस आणि वेळही एकच आहे. त्यामुळे उमेदवारांची अडचण वाढली आहे.

एमपीएससीच्या मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या अनेक उमेदवारांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियांत्रिकी पदाच्या परीक्षेसाठीही अर्ज केले आहेत. आता दोन्ही परीक्षा एकाच दिवशी होणार असल्याने उमेदवारांना कुठलीही एकच परीक्षा देता येणार आहे. त्यामुळे उमेदवारांची अडचण वाढली आहे. अनेक उमेदवारांचा गोंधळ होणार असल्याने परीक्षेच्या तारखेत बदल करावा अशी मागणी समोर येत आहे.

# “पूर्णविराम” नाटकाने एक वेगळाच विषय केला सादर



**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** ६२ व्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धे मधे अमरावती केंद्रावरील प्राथमिक फेरीत आज दि. २४ रोजी इरफान मुजावर लिखित आणि हर्षद ससाणे दिग्दर्शीत पूर्णविराम नाटक सादर करण्यात आले. या नाटकाला रसिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि संचालक सांस्कृतिक कार्य बिभीषण चावरे यांचे मार्गदर्शनात स्पर्धेची ही प्राथमिक फेरी संपूर्ण महाराष्ट्रात सुरु आहे. एक प्रसिद्ध कलावंत मनोहर, त्याची पत्नी अनिता आणि त्याची प्रेयसी माधवी यांच्या भोवती कथावस्तू गुंफलेली आहे. कर्क रोगासारख्या असाध्य व्याधीने ग्रासलेला हा मनोहर डॉक्टरांचा कोणताही सल्ला न ऐकता आपली व्यसनाधिनता तशीच सुरु ठेवतो आणि पहिला अंक संपताना तो सुद्धा संपलेला असतो. जगतातील सर्वाधिक क्लिष्ठ विषय म्हणजे नातं आणि याच विषयाची मांडणी या नाट्यकृतीत आहे.अनेक लेखकांनी, अभ्यासकांनी, मानसशस्त्रज्ञानी नात्यातील ओढ आणि तेढ उकलण्याचा प्रयत्न केला असला तरी तो अनकलनीय विषय आहे. आणि हे नातं जर कलावन्तामधील असेल तर ती गुंतागुंत अधिकच वाढत जाते. कलाकाराची पत्नी होणं हे जसं सतीच वाण आहे तसंच कलाकाराची मैत्रीण किंवा प्रेयसी होणं हे देखील सतिच वाणच आहे,हाच या नाटकाचा गाभा आहे. जसजशी स्पर्धा पुढे सरकते आहे तसतशी रसिकांची उपस्थिती सुद्धा वाढते आहे. पूर्णविराम या नाटकाची निर्मिती अथ इति नाट्यकला प्रतिष्ठान , अमरावती यांची असून दिग्दर्शन आणि मनोहर ही भूमिका हर्षद ससाणे यांनी सांभाळली. मनोहर च्या पत्नी च्या भूमिकेत वैष्णवी राजगुरे तर प्रेयसीच्या भूमिकेत आर्या वानखडे होत्या. ब्रदर / लकीच्या भूमिकेत विष्णू आवंडे तर नर्स च्या भूमिकेत प्रियंका तायडे यांनी अभिनय केला.

तांत्रिक बाजू म्हणजे नेपथ्य निकष देशमुख यांनी तर संगीताची बाजू तेजस लहाने , रंगभूषा अभिजित देशमुख, प्रकाश योजना दीपक नांदगावकर यांनी सांभाळली. आज शनिवार दि. २५ रोजी व्यंकटेश माडगूळकर लिखित आणि दीपक नांदगावकर दिग्दर्शीत सती हे नाटक सादर होणार आहे. संत ज्ञानेश्वर नाट्य गृहात ठीक ७.०० वाजता सुरु होणार असलेल्या या नाटकाला रसिकांनी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन स्पर्धा समन्वयक ऍड. चंद्रशेखर डोरले आणि सहसमन्वयक श्रद्धा पाटेकर व विशाल फाटे यांनी केले आहे.–

# राममंदिर लोकार्पणासाठी विदर्भातून १२० जणांची यादी; दहा दिवस धार्मिक कार्यक्रम

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर –** श्रीराम जन्मभूमी न्यासतर्फे येत्या २२ जानेवारीला अयोध्येत होणारा राम मंदिराचा लोकार्पण सोहळा भव्य स्वरूपात होणार आहे. या मंदिराच्या लोकार्पण सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. विश्व हिंदू परिषदेच्या प्रत्येक प्रांतातून कार्यकर्ते अयोध्येला जाणार आहेत. विदर्भातून १२० जणांची यादी श्रीराम जन्मभूमी न्यासाला पाठविण्यात आली.

बहुप्रतीक्षित अयोध्येतील राम मंदिराचा सोहळा दोन महिन्यांवर येऊन ठेपला आहे. न भूतो न भविष्यती सोहळ्याला प्रत्यक्षात उपस्थित राहण्याची अनेकांची इच्छा आहे. विश्व हिंदू परिषदेतर्फे अशा १२० जणांची यादी विदर्भातून पाठविण्यात आली. श्रीराम जन्मभूमी न्यास पुढील आठवड्यापर्यंत या नावांवर अंतिम निर्णय घेणार आहे. या काळात सर्वत्र राममय वातावरणाची निर्मिती होणार आहे.

त्यासाठी स्थानिक पातळीवर विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. २२ जानेवारीच्या दहा दिवसांपूर्वीपासून विविध परिसरातील मंदिरांमध्ये धार्मिक उपक्रम होणार आहेत. त्यानुसार दहा दिवस मंदिरात रोज श्रीरामाची आरती होईल. मंदिरात रोज सकाळ-सायंकाळ



रामगीते होतील. घरावर लावण्यासाठी भगव्या पताकांचे वाटप होईल.

अयोध्येत या सोहळ्याची जंगी तयारी सुरू असतानाच विदर्भात विविध उपक्रम, स्पर्धा आदींच्या माध्यमातून वातावरण निर्मिती करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या परिसरातील मंदिरांद्वारे भाविकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे.त्याअंतर्गत १ डिसेंबर ते १५ जानेवारीदरम्यान भारतीय संस्कृती ज्ञान स्पर्धा, रामायण प्रश्नमंजूषा, रामायणातील विविध भूमिका किंवा व्यक्तिरेखा साकारणे स्पर्धा, रामायणावर एकांकिका स्पर्धा, समूह गीत स्पर्धा, भजन-कीर्तन स्पर्धा, अखंड रामनाम जप आयोजन अशा विविध उपक्रमांच्या आयोजनाचा प्रयत्न आहे.

### १३ फेब्रुवारीला दर्शनाची संधी

२७ जानेवारीपासून देशभरातील मोजक्या कार्यकर्त्यांना अयोध्येत दर्शन घेण्याचे भाग्य लाभणार आहे. यासाठी नियोजन पूर्ण झाले असून, १३ फेब्रुवारी रोजी विदर्भ आणि कोकणातील, १४ फेब्रुवारी रोजी देवगिरी आणि पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील २-२ हजार कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

# विद्यापीठांमध्ये बनावट नेट/सेट, एम.फिल प्रमाणपत्र पडताळणीची यंत्रणा नाहीच

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** राज्यात एकाही विद्यापीठाकडे बनावट राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट), राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) अथवा एम.फिल प्रमाणपत्र पडताळणीची स्वतंत्र यंत्रणा नाही. वाशिम जिल्ह्यातील कामरगाव येथील कला, विज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक सुरेंद्र चव्हाण यांचे नेट पात्रता परीक्षा प्रमाणपत्र 'फेक' असल्याचे यूजीसीने २७ ऑक्टोबर २०२३ रोजी जाहीर केले. त्यामुळे बनावट प्रमाणपत्र



आणा नि कलेक्टरसमान गलेलठ्ठ वेतनाची नोकरी मिळवा, असाच काहीसा प्रकार उच्च शिक्षण क्षेत्रात सुरू आहे. प्राध्यापक असो वा सहयोगी प्राध्यापक या पदाला विद्यापीठाकडून मान्यता घेणे अनिवार्य आहे. त्यानंतर संबंधित महाविद्यालयात ही भरतीप्रक्रिया राबविली जाते. मुलाखतीसाठी विद्यापीठातून एक्स्पर्ट अधिकारी नेमले जातात; पण संबंधित प्राध्यापकांचीशैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र खरे की खोटे? याबाबतची मान्यतेपूर्वी शहानिशा एक्स्पर्ट अधिकाऱ्यांनी करावी, असे अपेक्षित असते.मात्र नेट/सेट, एम.फिलच्या प्रमाणपत्राची कशी, कोठे पडताळणी करावी यासंदर्भात यूजीसी अथवा राज्य शासनाकडून गाइडलाइन नाही.

# राजस्थानमध्ये मतदानाला सुरुवात

## भाजप-काँग्रेसमध्ये थेट लढत, दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला

### १९९ जागांसाठी १ हजार ८६३ उमेदवार रिंगणात




**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक जयपूर :** ३राजस्थानमध्ये आज विधानसभा निवडणुकीसाठी २०० पैकी १९९ मतदारसंघांमध्ये मतदान होत आहे. यासाठी सर्व तयारी पूर्ण झाली आहे. गेल्या काही दशकांमध्ये परंपरेने प्रत्येक विधानसभा निवडणुकीत राज्यातील सरकार बदलते. आज सकाळी ७ ते संध्याकाळी ६ या वेळेत मतदान होणार आहे. विधानसभेच्या १९९ जागांसाठी १ हजार ८६३ उमेदवार रिंगणात असून त्यांचे भवितव्य ५ कोटी २५ लाख ३८ हजार १०५ मतदार ठरवणार आहेत. राजस्थानच्या दिग्गजांसाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. विद्यमान मुख्यमंत्री अशोक गेहलोत, माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे, सचिन पायलट, राज्यवर्धन सिंह राठोड आणि दिया कुमारी यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांचे भवितव्य आज मतपेटीत (ईव्हीएम) बंद होणार आहे. राजस्थान विधानसभा निवडणुकीत भाजपनेही सत्ता परिवर्तनासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ट्विट करत म्हटले की, राजस्थान विधानसभा निवडणुकीसाठी आज मतदान होणार आहे. माझी सर्व मतदारांना विनंती आहे की त्यांनी जास्तीत जास्त मतदानाचा हक्क बजावून मतदानाचा नवा विक्रम निर्माण करावा. दरम्यान, मतदानासाठी सुरक्षा दलांनी कंबर कसली असून १.७० लाखांपेक्षा जास्त सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.पोलिस महासंचालक राजीव शर्मा यांनी सांगितले की, १८ राज्यांमधून सशस्त्र दलांची कुमक मतदानासाठी तैनात करण्यात आली आहे. ५२ हजार १३९ मतदान केंद्र आहेत.

# 'सीईटी-सेल'च्या वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेत घोळात घोळ; विद्यार्थ्यांची दमछाक



**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** इतर अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया होऊन पहिले सत्र आटोपले. मात्र 'सीईटी- सेल'च्या गोंधळामुळे वैद्यकीय अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया चांगलीच लांबली आहे. सध्या वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या ग्रुप 'बी'च्या प्रवेश प्रक्रियेत चौथ्या व पाचव्या 'स्ट्रे व्हॅकन्सी' राउंडची प्रक्रिया सुरू असून, शनिवारी (ता. २५) यादी जाहीर होईल.

प्रवेशासाठी २८ नोव्हेंबरपर्यंत मुदत असून, त्यापैकी दोन दिवस बँका बंद आहेत. अशात बँकेतून डीडी काढण्यासाठी एकच दिवस हातात आहे. विद्यार्थ्याला दूरचे महाविद्यालय मिळाले, तर डमिशन कशी घेणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

उच्चशिक्षणाचे त्यातही




वैद्यकीय अभ्यासक्रमात करिअर करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांची राज्यातील सीईटी-सेल शिक्षण सुरू होण्याआधीच 'परीक्षा' घेत आहे. एक तर अभियांत्रिकी, औषधशास्त्र निर्माणशास्त्र व अन्य अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रिया पूर्ण होऊन त्यांचे पहिले सत्र संपायला आले. तरीही 'सीईटी- सेल'च्या घोळामुळे वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया दिवसेंदिवस अधिक लांबत चालली असून क्लिष्टही होत आहे.

### सध्याची स्थिती अशी

या प्रक्रियेत स्ट्रे व्हॅकन्सीच्या चौथ्या, पाचव्या राउंडची नोटीस २२ नोव्हेंबरला आली. त्यात बीएएमएसच्या दोन नवीन महाविद्यालयांसह बीएचएमएसच्या इन्स्टिट्यूशनल कोट्यातील उर्वरित जागा जिथे आहेत, त्या महाविद्यालयांचे ऑप्शन २३ तारखेच्या दुपारी बारापर्यंतच भरायचे होते. मात्र २३ तारखेच्या सकाळी दहापर्यंत 'सीईटी- सेल'च्या साइटवर तांत्रिक अडचणीमुळे ऑप्शन भरले जात नव्हते. दहा वाजता ती सुरू होऊन विद्यार्थ्यांनी कसेबसे दुपारी बारापर्यंत ऑप्शन भरले.

### नोटिशीत पुन्हा बदल

याच नोटिशीत २३ तारखेच्या मध्यरात्रीनंतर बदल होऊन सुधारित नोटीस आली. त्यानुसार २४ तारखेस दुपारी १२ ते ८ पर्यंत नवीन बीएएमसएस महाविद्यालय व बीएचएमएसच्या उर्वरित जागांची महाविद्यालये ऑप्शन म्हणून 'स्ट्रे व्हॅकन्सी' राउंड-३ मध्ये भरलेल्या महाविद्यालयांच्या प्राधान्यक्रम यादीत (प्रेफरन्स लिस्ट) समाविष्ट करता येणार आहे.

### सहा महिने घालवले

जुलैमध्ये 'नीट'चा निकाल लागल्यानंतर सहा महिन्यांचा कालावधी उलटून गेला, तरीही वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या विविध शाखांची प्रवेश प्रक्रिया संपलेली नाही. पैकी केवळ एमबीबीएस, बीडीएसचे प्रवेश दोन आठवड्यांपूर्वी आटोपले. सध्या वैद्यकीय अभ्यासक्रमातील ग्रुप 'बी'मधील बीएएमएस, बीएचएमएस व बीयूएमएस या शाखांची प्रवेश प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. या प्रक्रियेत 'सीईटी- सेल'ने सहा महिने घालवून दिलेत.

# सर्वोच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायाधीश फातिमा बीवी यांचं निधन

## वयाच्या ९६ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास



**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई –** सर्वोच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायाधीश फातिमा बीवी यांचं वयाच्या ९६ व्या निधन झालं आहे. फातिमा बीवी यांनी तमिळनाडूच्या राज्यपाल म्हणून देखील काम केलं आहे. गुरुवार २३ नोव्हेंबर रोजी रुग्णालयात त्यांचे निधन झाले. केरळच्या आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज यांनी फातिमा बीवी यांच्या निधनावर शोक व्यक्त केला. केरळच्या आरोग्यमंत्री वीना जॉर्ज यांनी म्हटलं की, फातिमा बीवी या एक बहादुर महिला होत्या. त्यांच्या नावावर आजवर कित्येक रेकॉर्ड नोंदवण्यात आलेत. त्यांनी आपल्या जगण्यातून दाखवून दिलं आहे की, दृढ इच्छाशक्तीवरुन कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीवर मात करता येते.

फातिमा बीवी यांचे पूर्ण नाव मीरा साहिब फातिमा बीवी असे आहे. त्यांचा जन्म ३० एप्रिल १९२७ रोजी रोजी केरळ मधल्या पतनमतिट्टा या गावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव मीर साहिब, तर आईचे नाव ख़दीजा बीबी आहे.फातिमा बीवी यांनी त्रिवेंद्रम येथून बी.एस.सी.ची आणि तिरुवनंतपुरम या शहरातून बी.एल. ही पदवी घेतली. ६ ऑक्टोंबर १९८९ मध्ये त्यांना सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायाधीश म्हणून त्याची निवड झाली. भारतातून एवढ्या मोठ्या पदावर जाणाऱ्या त्या पहिल्या पहिल्या महिला होत्या.२९ एप्रिल १९९२ रोजी त्या सेवानिवृत्त झाल्या. दरम्यान त्यांनी १९९७ ते २००१ या काळात तमिळनाडूच्या राज्यपाल म्हणून देखील काम पाहिलं.

**फातिमा बीवी यांचे बालपण–** सुरुवातीपासूनच अभ्यासात हुशार असलेल्या फातिमा यांनी १९५० मध्ये बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. त्या वेळी या परीक्षेत अव्वल ठरणाऱ्या त्या पहिल्या महिला होत्या. त्याच वर्षी नोव्हेंबर महिन्यात फातिमा यांनी वकील म्हणून नोंदणी केली आणि केरळच्या कनिष्ठ न्यायव्यवस्थेत त्यांची प्रॅक्टिस सुरू केली. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश होण्यापूर्वी फातिमा बीबी न्यायिक सेवांमध्ये कार्यरत होत्या. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश म्हणून निवृत्त झाल्यानंतरही फातिमा बीबी या तामिळनाडूच्या राज्यपाल होत्या. २५ जानेवारी १९९७ मध्ये तमिळनाडूच्या राज्यलपालपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली. आपल्या एका मुलाखती दरम्यान फातिमा बीवी यांनी म्हटलं होतं की, सध्या बार आणि बेंच या दोन्ही ठिकाणी अनेक महिला आहेत. पण त्यांचा सहभाग कमी आहे. त्यांचे प्रतिनिधित्व पुरुषांच्या बरोबरीचे नाही. महिलांनी हे क्षेत्र उशिरा निवडल्याचेही एक मोठं कारण त्यामागे आहे. महिलांना न्यायव्यवस्थेत समान प्रतिनिधित्व मिळण्यासाठी वेळ लागेल.

### सर्वोच्च न्यायालयापर्यंतचा प्रवास

भारतात ज्या काळात पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा होता, त्या काळात फातिमा यांनी न्यायाधीश होण्याचं स्वप्न पाहिलं होते. जे त्यांनी पूर्ण देखील केलं. १९५० रोजी भारतात सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. पण त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाला महिला न्यायाधीश मिळण्यासाठी ३९ वर्षांचा कालावधी लागला. ३९ वर्षांनंतर भारताच्या सर्वोच्च न्यायालयात फातिमा बीवी यांना पहिल्या महिला न्यायाधीश म्हणून सन्मान मिळाला. त्याआधी त्यांची १९८३ मध्ये केरळच्या उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून नेमणूक करण्यात आली. तिथे त्यांनी सहा वर्ष म्हणजे १९८३ ते १९८९ अशी सेवा दिली. उच्च न्यायालयातून निवृत्त झाल्यानंतर अवघ्या सहा महिन्यातच त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचा पदभार स्विकारला.

# दर्यापूर तालुका दुष्काळग्रस्त घोषीत करा व पिक विमा रक्कम लवकरात लवकर द्या

## भाजपा किसान आघाडी तर्फे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना निवेदन

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर** –अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील हे अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता,त्यांना दर्यापूर तालुक्यात सलग ४० दिवस पाऊस न आल्यामुळे शेती पिके मुंग,उडीद,सोयाबीन ह्या पिकांचे पूर्णतः नुकसान झाले आहे.त्यामुळे दर्यापूर तालुका दुष्काळग्रस्त घोषीत करा व पिक विमा रक्कम लवकरात लवकर द्या अशा मागणीचे निवेदन दर्यापूर तालुका भाजपा किसान आघाडी तर्फे प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब वानखडे यांच्या नेतृत्वात देण्यात आले.सदर निवेदनात म्हटले आहे की,तालुक्यातील शेतकऱ्याचा पाऊस वेळेवर न आल्याने मुंग,उडीद,सोयाबीन ह्या पिकांचे पूर्णतः नुकसान झाले व कपाशी,तुर ह्या पिकांच्या पेरणी पासुन आता पर्यंत लागवडीचा खर्च सुध्दा निघाला नाही आणि हा तालुका कोरडवाहू असल्यामुळे हरभऱ्याची पेरणी सुध्दा करता येत नाही. दर्यापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना सन २०२२-२३ ची



पिक विमा रक्कम अजुन पर्यंत मिळाली नाही. तसेच सन २०२३-२४ चा पाऊस कमी झाल्यामुळे २५% मिळणारी पिकविमा आगाऊ रक्कम अजुन पर्यंत मिळाली नाही,यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. विमा कंपनी दिशाभूल करीत आहे.सदर बाब लक्षात घेता दर्यापूर तालुका दुष्काळग्रस्त जाहिर करा व शेतकऱ्यांना सदर मोबदला रक्कम त्वरीत देण्यात यावी.तसेच दर्यापूर तालुक्यात शेतीचा विज पुरवठा हा दिवसा करण्यात यावा याबाबत आदेश देण्यात यावेत.अशी मागणी सुद्धा करण्यात आली आहे.निवेदन देताना भारतीय जनता पार्टी जिल्हा अध्यक्ष तथा राज्यसभा खासदार डॉ अनिलजी बोन्डे,किसान आघाडीचे प्रदेश उपाध्यक्षबाळासाहेब वानखडे,माजी आमदाररमेशजी बुंदीले जिल्हा उपाध्यक्षबाबाराव पाटील बरवट, श्रीरामजी नेहर दर्यापूर तालुका अध्यक्ष मदनपाटील बायस्कर, शहर अध्यक्ष रवींद्र ढोकणे,प्रवीण टाले उपस्थित होते.

आता लोकप्रिय असलेल्या सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
मध्ये छोट्या जाहिरातीसाठी संपर्क करा
मो.८६२४९८५६३३
घर विकणे,नोकरी विषयक,सहल यात्रा,पाहिजेत,भाड्याने देणे आहे या प्रकारच्या छोटी जाहिरात१० ओळीची मिनी ऍड फक्त ५०/– रु मध्ये प्रति दिवस तेही बोल्ड बॉक्स मध्ये चार दिवसानंतर एक दिवस फ्री..

# तपोवन मध्ये वनविभागाने केले 'सायल' रेस्क्यू : वनविभागाचे यशस्वी सर्च ऑपरेशन



**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जंगली क्षेत्रात मानवाचा हस्तक्षेप वाढल्यामुळे शहरातील कॉंक्रिट जंगलात राहणाऱ्या नागरिकांमध्ये कधी बिबटमुळे भिती, कधी अजगर निघाल्यामुळे दहशतीचे वातावरण निर्माण होत आहे. विमवी आणि मंगलधाम परीसरात बिबट्याची दहशत सध्या जोरात आहे. गेल्या महिनाभरापूर्वी म्हणजे २३ ऑक्टोंबर २०२३ रोजीदस्तुरनगर परिसरातील न्यू कॉलनी, श्री कॉलनी आणि साधना कॉलनी या भागात या सायलचे दर्शन झाल्याने भितीचे वातावरण निर्माण झाले. पण, ती सायल वनविभागाच्या हाती लागली नव्हती. मात्र शुक्रवारी

सायंकाळी वनविभागाने विद्यापीठ तपोवन परीसरात 'सायल' एका पाण्याच्या खड्ड्यातून सुखरुप बाहेर काढून रेस्क्यु केले आहे.

२३ ऑक्टोंबरला रात्री दस्तुर नगर परिसरातील न्यू कॉलनी, श्री कॉलनी आणि साधना कॉलनी याभागात या सायलचे दर्शन झाले होते. त्यानंतर पुन्हा सोमवारला सायंकाळी सायलचे धन्वंतरी नगरच्या मागच्या भागात हरीगंगा ऑईलहरीगंगा ऑईल मिल, अशोक स्टेट बँक कॉलनी, गणेश नगरातील नाल्याच्या परीसरात 'पुन्हा सायलने' त्याच्या अंगावरील काटे फुलवून दर्शन दिल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरणनिर्माणझाले होते. जीवाच्या आकांतापोटी भयभित झालेले सायल हे स्वतःचा बचाव करण्यासाठी अंगावरील काटे फुलवून इकडून तिकडे धावत होते. तर वनविभागाचे कर्मचारी पकडण्याचा प्रयत्न करीत होते. मात्र यश मिळाले नाही.

दरम्यान, जंगल परीसराला लागून असलेल्या विद्यापीठ-तपोवन पुरीसरात शुक्रवारला रोडवर सायलचे दर्शन घडले. वनविभागाला त्याची माहिती मिळताच सायल रेस्क्यु करण्यासाठी वनविभागाचीटिमपिंजऱ्यासह दाखल झाली. वनविभागाचे कर्मचारी आले असता पाण्याच्या टाक्याच्या खड्ड्यात ते सायल लपले होते. त्याला बेशुद्ध करून सुखरुप बाहेर काढले आणि पिंजऱ्यात बंद केले आहे. वनविभाग त्याला नंतर जंगलात सोडून देणार आहे. वनविभागाने सायल जेरबंद केल्याने परीसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. रेस्क्यु पथकात आरएफओ हरणे मॅडम, वनपाल श्याम देशमुख, वनरक्षक सुनिल टिकले, वनमजुर ओंकार भुरे, वैभवराऊत, वाहन चालक संदिप चौधरी यांची टिम सहभागी होते.

# संविधान दिनी जनआक्रोश आंदोलन

## रविवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्यातील मागासवर्गीय अधिकारी, कर्मचारी व समाज घटकांशी निगडित व रखडलेल्या २२ न्याय मागण्यासाठी संविधान दिनी रविवारी (ता. २६) भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर यांच्या नेतृत्वात राज्यव्यापी आक्रोश आंदोलन होणार आहे. जिल्ह्यात विजयकुमार चोरपगार यांच्या नेतृत्वात जिल्हा कचेरीसमोर आदोलन करण्यात येणार आहे. राज्यातील मागासवगीय अधिकारी, कर्मचारी व समाज बांधवांना दिवसागणिक अन्याय, अत्याचार,वाढतच आहेत.

घटनादत्त अधिकार नाकारण्यात येत आहेत. संविधानाने स्वीकारलेली कल्याणकारी राज्याची संकल्पना धुळीस मिटविल्या जात आहे. १ नोव्हेंबर २००५ नंतर शासन सेवेत प्रवेशित अधिकारी, कर्मचारी यांना १९८४ ची जुनी पेन्शन योजना नाकारण्यात आली, खासगीकरण सुरू केले आहे. शिक्षणाचे बाजारीकरण, समूह शाळा योजना व दत्तक योजना धोरणांचा अवलंब करून गोरगरिबांना शिक्षण नाकारण्याचे



कटकारस्थान सुरू झाले आहे. असा आरोप संघटनेने केला आहे. आंदोलनात विविध मागासवर्गीय अधिकारी कर्मचारी यांचा महासंघ असलेल्या अखिल भारतीय मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी महासंघ या संघटनेने विविध मागासवर्गीय अधिकारी कर्मचारी संघटनांसोबत समन्वय करून विशेष पुढाकार घेऊन घेतला आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय अधिकारी कर्मचारी महासंघ देखील सहभागी होत आहे.या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन मागासवर्गीय अधिकारी, कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष विजयकुमार चौरपगार, बी. ए. राजगडकर, पी. एम. धुर्वे, व्हो.यू. दर्द, मंगेश सोळके, नामदेव गडलिंग, आशिष नागरे, कैलास गुळसुंदरे, ऋतुराज पहरकर, आशिष ढवळे, नीलेश रायचोले, विश्य बसवनापे, रंगराव तायडे, विजय वाघमारे आदींनी केले आहे.

# अचलपूर मंडित सोयाबीन,मका ची बंफर आवक

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक परतवाडा**

अचलपूर बाजार समितीमध्ये सोयाबीन तसेच मक्याची मोठ्या प्रमाणात आवक झाली आहे. मका ३२ हजार १० कट्टे तर सोयाबीन ९ हजार ७८२ कट्ट्यांची आवक झाली असून या २३ दिवसात मका १ लाख ८१ हजार १४८, तर ५४ हजार १०१ कट्टे सोयाबीनची आवक झाली आहे.

मेळघाट तसेच अचलपूरसह आजूबाजूचे तालुके तसेच मध्यप्रदेश मधील शेतकरी मोठ्या प्रमाणात अचलपूर बाजार समितीत शेतमाल आणतात. यावर्षी पावसामुळे पिकांना फटका बसला. बऱ्याच शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न झाले, तर काहींना बऱ्यापैकी उत्पन्न झाले. सोयाबीन, मका, आदी शेतमालशेतकरी बाजारात

## मका १ लाख ८१ हजार तर सोयाबीनचे ५४ हजार कट्टे



विक्रीसाठी आणत आहेत. अचलपूर बाजार समितीत गेल्या १ ते २३ नोव्हेंबर २३ दिवसात मका १ लाख ८१ हजार १४८ तर ५४ हजार १०१ कट्टे सोयाबीनची आवक झाली. गुरुवारी (ता.२३) एकाच दिवशी सोयाबीनची तब्बल ९ हजार ७८२ कट्टे तर मका ३२ हजार १० कट्ट्यांची आवक झाली आहे. गेल्या काही दिवसात अडद व्यापार फुलला असून शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

**सोयाबीनला पाच हजारांवर भाव**

सोयाबीनचा भाव ५ हजार ते ५११५ रुपये वर तर मक्याचा भाव १७०० ते २१०० रुपये सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे बरेच शेतकरी विक्रीवर भर देत असल्याचे काही व्यापारी व शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

# भारत गणेशपुरे,भास्करराव पेरेंना स्व.बापुरावजी तुरखडे उदीम पुरस्कार जाहीर

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

प्रतिभा साहित्य संघाच्या केन्द्रीय कार्यकारिणीचे उपाध्यक्ष प्रा.प्रमोद तुरखडे यांच्या वतिने त्यांच्या वडिलांच्या स्मृतिपित्यर्थ सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी स्व.बापुरावजी पाटील तुरखडे उदीम पुरस्कार देऊन गौरवण्यात येते.२०२१-२२ व २०२२-२३ या दोन वर्षातील पुरस्कार चित्रपट अभिनेते भारत गणेशपुरे आणि ग्रामोद्धार प्रणेते भास्करराव पेरे पाटील यांना जाहीर करण्यात आले असून दिनांक ९



व १० डिसेंबर रोजी संपन्न होत असलेल्या चिखलदरा येथील चित्रांगण कला साहित्य संमेलनात मान्यवरांचे हस्ते हे मानाचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.रोख रक्कम,उदीम प्रतिकृती, स्मृतिचिन्ह, सम्मानपत्र,शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.भारत गणेशपुरे यांनी आपल्या सकस अभिनया सोबतच वैदर्भीय वऱ्हाडी बोलीभाषेला एका विशिष्ट उंचीवर नेऊन,तिचा नावलौकिक वृद्धींगत केल्याबद्दल आणि भास्करराव पेरे पाटील यांनी गावाच्या विकासाकरीता कल्पकतेची,मेहनतीची जोड देऊन,आदर्श ग्रामराज्य निर्माण करून तसेच महाराष्ट्रातील गावकऱ्यांना त्याकरिता सातत्याने प्रेरित केल्याबद्दल सदर पुरस्कार जाहीर करण्यात आल्याची माहिती प्रतिभा साहित्य संघाने प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

# फुलकोबी २० रुपये किलो, पालक दहाला; कसे परवडेल आम्हाला

## भाजीपाला उत्पादक संकटात : दर घसरल्याने फेकून देण्याची वेळ



**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

दिवाळीत वाढलेले भाजीपाल्याचे दर आता चांगलेच घसरले आहेत. ग्राहकांना ४० ते ६० रुपये किलोने विकली जाणारी फुलकोबी शेतकऱ्यांकडून २० रुपये किलो तर ४० रुपये किलो विकली जाणारी पालक दहा रुपये किलो दराने खरेदी केली जात आहे. एरवी दर वाढल्यानंतर ओरडणारे ग्राहक शेतकऱ्यांची व्यथा मात्र जाणत नाहीत, एवढ्या कमी दरात भाजीपाला विकणे आम्हाला कसे परवडेल असा प्रश्न शेतकरी उपस्थित करीत आहेत.

यंदा सणासुदीच्या काळात दरात बऱ्यापैकी वाढ झाली असली तरी भाजीपाल्याचे उत्पादन जेमतेम असल्याने शेतकऱ्यांना त्याचा म्हणावा तसा फायदा झाला नाही. आता भाजीपाल्याचे उत्पादन बऱ्यापैकी वाढले असताना बाजारात शेतकऱ्यांचा माल कवडीमोल दराने घेतला जात आहे.

टोमॅटो वगळता जवळपास सर्वच भाज्यांची अल्पदरात शेतकऱ्यांकडून खरेदी केली जात आहे. कोबी, पालक, मिरची, मेवी, वांगी, भेडी आदी सर्वच भाज्यांची खरेदी कवडीमोल दरात होत आहे.

### आवक वाढताच होते दरात घसरण

भाजीपाल्याची बाजारात आवक वाढली की, दरात घसरण होते. हा शेतकऱ्यांचा नेहमीचाच अनुभव आहे. फवारणी, खतांसह आंतरमशागतीसाठी वारेमाप खर्च करून उत्पादन वाढविले की शेतकयांचा पदरी निराशा येते. दर घसरल्याने अनेक शेतकऱ्यांना, तर शेतात पिकलेला भाजीपाला बाजारा-पर्यंत पोहोचविण्याचा वाहनाचा खर्चही भारी होतो.

### ग्राहकांना कोठे मिळतात स्वस्त

शेतकऱ्यांकडून अल्पदराने भाजीपाला खरेदी होत असला तरी ग्राहकांना मात्र त्याचा फायदा होत नाही. शेतकऱ्यांकडून १५ रुपये किलो दराने खरेदी केली जाणारी फुलकोबी ग्राहकांना मात्र ४० ते ६० रुपये किलो, ४० रुपये किलोने खरेदी होणारा शेवगा ८० रुपये किलो दराने, १० रुपये दराने खरेदी होणारी पालक ४० रुपये किलो दराने ग्राहकांना विकली जाते.

# चांदुर रेल्वे तालुक्यातील सातेफळ येथे पोटनिवडणूक कार्यक्रम जाहीर

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक चांदुर रेल्वे**

चांदुर रेल्वे तालुक्यातील पंचायत समिती सातेफळ निर्वाचन गणाचा पोट निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार मतदान दि. १७ डिसेंबर व मतमोजणी १८ डिसेंबरला होणार आहे, अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी दिली.




कार्यक्रमानुसार, दि. २८ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्यात येतील. रविवार दि. ३ डिसेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने नामनिर्देशन पत्र स्वीकारण्यात येणार नाही. नामनिर्देशनपत्रांची छानणी दि. ५ डिसेंबर रोजी सकाळी ११ वा. पासून करण्यात येईल व छाननीनंतर लगेच वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येण्यात येईल. नामनिर्देशनपत्राचा स्वीकार करण्याबाबत किंवा ते नामंजूर करण्याबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायाधीशांकडे अपील करण्याची शेवटची तारीख ८ डिसेंबर आहे. जिल्हा न्यायाधीशांनी अपीलावर सुनावणी व निकाल देण्याची शेवटची तारीख ११ डिसेंबर आहे.

अपील नसलेल्या ठिकाणी दि. ११ डिसेंबर रोजी, तर अपील असलेल्या ठिकाणी दि. १३ डिसेंबर रोजी दु. ३ वा. पर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी व निशाणी वाटप अपील नसलेल्या ठिकाणी दि. ११ डिसेंबर रोजी व अपील असलेल्या ठिकाणी दि. १३ डिसेंबर रोजी दु. ३.३० नंतर होईल. मतदान केंद्राची यादी दि. १३ डिसेंबरला प्रसिद्ध होईल. मतदान दि. १७ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वा. दरम्यान आणि मतमोजणी दि. १८ डिसेंबरला सकाळी १० वा. पासून होईल. निवडून आलेल्या सदस्यांचे नाव २१ डिसेंबरपर्यंत प्रसिद्ध करण्यात येईल. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून निकाल जाहीर होईपर्यंत सदर क्षेत्रात आचारसंहिता अंमलात राहील.

# चोरी,घरफोडी तीन अट्टल गुन्हेगार पोलिसांच्या ताब्यात : अनेक जिल्ह्यात गुन्ह्यांची नोंद

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

चोऱ्या, घरफोड्यांमध्ये पोलिस रेकॉर्डवरील सराईत संशयितासह अन्य दोन साथीदार अशा तिघांना राजापेठ पोलिसांनी अटक केली असून, त्यांनी पाच घरफोड्यांची कबुली दिली.

शंकर सुभाष बनसोड (वय ४२, रा. भीमनगर), परमेश्वर अशोक सुखदेवे (क्य १९, रा. केडीयानगर) व पंकज राजू गोंडाने (वय २७, रा. चवरेनगर) अशी अटकेतील तिघा संशयितांची नावे असून, पंकज हा टोळीचा म्होरक्या आहे. त्यापैकी प्रकृती अस्वस्थतेचे कारण पुढे केल्याने संशयित बनसोड याला न्यायालयीन कोठडीअंतर्गत कारागृहात पाठविण्यात आहे. तर, सुखदेवे व गोंडाणे हे दोघे राजापेठ पोलिसांच्या कोठडीत आहेत. पोलिसांनी चौकशी केली असता, राजापेठहद्दीतील पाच घरफोड्यांची कबुली त्यांनी दिली. या व्यतिरिक्त गाडगेनगर व फ्रेजरपुरा हद्दीतही १० घरफोड्या केल्याची बाब पुढे आली. असे पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी शुक्रवारी (ता.२४) पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी राजापेठच्या पोलिस निरीक्षक सीमा दाताळकर उपस्थित होत्या. राजापेठ हद्दीतील पाच घरफोड्यांमध्ये ६ लाख ५३ हजार ७७५ रुपयांचा मुद्देमाल चोरी गेला होता. त्यापैकी नमुद तिघांकडून १ किलो २५० ग्रॅम चांदी १ लाख ४० हजार रुपये किमतीची, एमएच २७ सीएन ८६१० क्रमांकाची ५० हजार रुपयांची दुचाकी,३३.९०० ग्रॅम सोन्याची लगड, १ हजार५६० रुपये रोख असा एकूण ३ लाख ८३ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

# रोटरीच्या सामाजिक उपक्रमाचा महायज्ञ

## उडाण प्रकल्पांतर्गत शेकडो गरजू विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आंतरराष्ट्रीय पातळीवर सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या रोटरी क्लबने अंबानगरी अमरावतीत सामाजिक उपक्रमाचा महायज्ञ आयोजित करीत उडाण प्रकल्प अंतर्गत तब्बल ४०० गरजू विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप केले. रोटरीच्या डिस्ट्रिक्ट गव्हर्नर आशा वेणुगोपाल यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाने एक वेगळा पायंडा पाडत आदर्श निर्माण केला आहे

बडनेरा रोड स्थित प्राईम पार्क येथे रोटरीच्या उडाण सायकल प्रकल्पांतर्गत गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रोटरीच्या गव्हर्नर आशा वेणुगोपाल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमास खासदार नवनीत राणा ,ज्येष्ठ संपादक नानक आहुजा, माजी गव्हर्नर किशोर केडिया ,वीरेंद्र पात्रीकर, असिस्टंट गव्हर्नर आनंद दशपुते ,अतुल कोल्हे आदी मान्यवर उपस्थित होते .कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये आनंद दशपुते यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. याप्रसंगी किशोर केडिया यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर रोटरीवर सामाजिक सेवेचे संस्कार असून याला व्यापक बनविण्याचे काम रोटरीचे सदस्य करीत आहे .गरजू मुलांसाठी सायकलचे महत्त्व खूप असून रोटरी या सर्व मुलांना सायकलचे वाटप करून माणुसकी जपत असल्याचे प्रतिपादन जेष्ठ संपादक नानक आहुजा यांनी केले.



**फक्त कार्य करा : खासदार राणा**

पुरुषांपेक्षा महिलांची विचारसरणी व दृष्टी वेगळी असते परिवाराला सांभाळून काही चांगले कार्य करण्यासाठी जीवाचे रान करणाऱ्या काही महिला असून आशा वेणुगोपाल यांनी अशा उपक्रमास दिलेले योगदान अभिनंदनिय असल्याचे प्रशंसोदगार खासदार नवनीत राणा यांनी काढले .शिक्षणामध्ये गरिबी आडवी येऊ देऊ नका ,जीवनात फक्त कार्य करीत, जा यश नक्कीच मिळेल असा संदेशही खासदार नवनीत राणा यांनी आपल्या भाषणातून दिला .यावेळी रोटरी अंबिकाचे सचिव अमोल चवणे यांना राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तसेच गरजू विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सायकल वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन श्रीकांत मानकर यांनी केले तर अतुल कोल्हे यांनी आभार मानले .या कार्यक्रमास एनक्लेव चेअर विवेक मराठे ,रोटरीच्या विविध शाखांचे अध्यक्ष ,सचिव, पदाधिकारी माजी अध्यक्ष , विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद शिक्षक बँकेत सेवानिवृत्तांचे सभासदत्व अबाधित

## त्या पाच विरोधी संचालकांचा बँकेला आर्थिक विवंचनेत आणण्याचा डाव फसला

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती: ३**

दी अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँक लि. अमरावती ही विभागीय कार्यक्षेत्र असणारी बँक असून तिचे पाच जिल्ह्यात एकूण जवळपास ११००० सभासद आहेत. त्यापैकी जवळपास १६०० सभासद हे शिक्षकी पेशातून सेवानिवृत्त झाले असून त्यांचे बँकेत जवळपास ७० ते ८० कोटी रुपयांच्या शेअर्स व ठेवी आहेत. शिक्षक बँकेची निवडणूक जुलै २०२३ मध्ये झाल्यानंतर नवीन संचालक मंडळ अस्तित्वात आले. त्यामध्ये गोकुळदास राऊत यांच्या नेतृत्वात १६ संचालक प्रगती पॅनलचे निवडून येऊन सत्तेत विराजमान झाले. तर प्रभाकर झोड, संजय नागे, मंगेश खेरडे, मनोज चोरपगार, गौरव काळे हे समता पॅनलचे पाच संचालक विरोधात बसले. या पाच विरोधी संचालकांनी एप्रिल २०२३ मध्ये बँकेतील सेवानिवृत्त झालेल्या सभासद संचालकांचे सामान्य सभासदत्व रद्द करणेबाबत विभागीय सहनिबंधक यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. इतकेच नव्हे तर ऑगस्ट २०२३ मध्ये झालेल्या आमसभेत सभासदांना देय असलेला त्यांच्या हक्काचा डिव्हिडंट लाभांक्ष सुद्धा सेवानिवृत्त सभासदांना देऊ नये असे निवेदन बँकेला व विभागीय सहनिबंधक यांना दिले होते. त्यामुळे विभागीय सहनिबंधक यांनी २४/०७/२०२३ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ तसेच बँकेच्या उपविधीशी विसंगत असणारा कारवाई करण्याचा आदेश दिला होता. या आदेशामुळे बँकेचे जवळपास १६०० सेवानिवृत्तांचे सभासदत्व रद्द होऊन बँकेच्या जवळपास ७० ते८० कोटीच्या ठेवी व शेअर्स हे त्यांना परत करावे लागणार असल्याने, पर्यायाने बँक आर्थिक अडचणीत येऊन दिवाळखोरीत येणार होती.बँकेचे अध्यक्ष हे सुद्धा सेवानिवृत्त झाल्याने गोकुळदास राऊत, रामदास कडू,व सदानंद रेवाळे यांनी या आदेशाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. २५/९/ २३ रोजी उच्च न्यायालयाने विभागीय सहनिबंधकांचा तो विसंगतआदेश रद्द करून सहनिबंधकांना पुन्हा सुनावणी घेऊन निर्णयाचा फेर विचार करण्याचे आदेश दिले. ३१ ऑक्टोबर २०२३ ला विभागीय सहनिबंधक यांनी दोन्ही पक्षाची बाजू ऐकून घेऊन सुनावणी घेतली. यावेळी शिक्षक बँकेची बाजू उच्च न्यायालयाचे वरिष्ठ वकील श्री. अजय घारे यांनी तर सेवानिवृत्त शिक्षकांची बाजू सतीश गट्टाणी यांनी मांडली. २२ नोव्हेंबर २०२३ ला विभागीय सहनिबंधक व्हि.डी.कहाळेकर यांनी कायद्याचे कलम १४४- ५ ही बँकेसाठी नसून पतसंस्था करीता आहे व बँकेची उपविधीतील कलम १०अ(३) ही सहकार कायद्यातील तरतुदीशी विसंगती नसल्याने त्या पाच संचालकांचा तक्रार अर्ज अमान्य करत नस्तीबद्ध केला.त्यामुळे आता सेवानिवृत्त सभासदांचे सामान्य सभासदत्व कायम राहणार असून भविष्यात त्यांना मतदानाचा अधिकार सुद्धा अबाधित राहणार आहे. श्री. गोकुळदास राऊत, रामदास कडु, सदानंद रेवाळे, उच्च न्यायालयाचे वरिष्ठ वकील ड.अजय घारे, ड.सतीश गट्टाणी यांनी केलेल्या प्रयत्नामुळे शिक्षक बँक आर्थिक संकटातून वाचली असून सेवानिवृत्त सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. परंतु त्या पाच विरोधी संचालकांचा बँकेला आर्थिक विवंचनेत आणण्याचा, व सेवानिवृत्त सभासदांना घरी पाठवण्याचा डाव फसल्यामुळे आता भविष्यात कोण घरी जाणार व पुढील संचालक मंडळाच्या निवडणुकीत त्या पाच संचालकांचा सेवानिवृत्त सभासद वचपा काढणार असल्याचे खाजगीत बोलले जात आहे.

# पीक तरारून आलं तर मिळेल इनाम! पीक स्पर्धेत भाग घ्या

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषी विभागाचे आवाहन



**अरुण जोशी**

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना, मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परीसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेवून राज्यांतर्गत पीक स्पर्धा योजना राबविण्यात आले आहे.

वंचित व दुर्लक्षित तसेच पौष्टिक - तृणधान्य पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादन तंत्रज्ञानात वाढ होण्याची आवश्यकता विचारात घेऊन तसेच जास्तीत जास्त शेतकरी पीकस्पर्धामध्ये सहभागी होतील, या दृष्टिकोनातून रब्बी हंगाम २०२३ पासून पीक स्पर्धा तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर राबविण्यात येणार आहे. त्यानुसार कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम सन २०२३ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या पाच पिकांसाठी पीक स्पर्धेचे आयोजन - करण्यात येत आहे. नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात च आले आहे.

### शेतकऱ्यांनी पीक स्पर्धेत सहभागी व्हावे

रब्बी हंगामात दुय्यम तसेच पौष्टिक तृणधान्य पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादनात वाढ होणे आवश्यक आहे, ही बाब विचारात घेऊन पीक स्पर्धेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी उपविभागीय कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

### पात्रता व निकष

स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावे जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत भाग घेता येईल. पीक स्पर्धेमध्ये सहभागी लाभार्थींच्या स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

# आगामी निवडणुकीमध्ये मताधिकार बजावण्यासाठी नवमतदारांनी मतदार नोंदणी करा

## जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांचे आवाहन

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भारत निवडणूक आयोगाने दि. १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर मतदार यादीचा विशेष पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. कार्यक्रमाअंतर्गत दि. ९ डिसेंबर २०२३ पर्यंत सर्व विधानसभा मतदार संघ व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या स्तरावर दावे व हरकती स्विकारण्यात येणार आहेत. तसेच या कालावधीत प्रयेक मतदार संघात विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. येत्या निवडणुकीमध्ये मताधिकार बजावण्यासाठी नवमतदार व नागरिकांनी मतदार नोंदणी करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.

मतदार यादीचा विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार नोंदणीसंदर्भात माहिती देण्यासाठी महसुल भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे आज पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक डॉ. निधी पाण्डेय, डॉ. पंजाबराव देशमुख प्रशिक्षण व विकास प्रबोधिनीचे संचालक तथा समन्वय अधिकारी अजय लहाने, उप जिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, निवडणूक नायब तहसीलदार प्रविण देशमुख तसेच पत्रकार



बांधव आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले की, निवडणूका पारदर्शक आणि न्याय वातारणात पार पाडण्यासाठी मतदार याद्यांचे विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत दि. २७ ऑक्टोबर ते ९ डिसेंबर २०२३ या कालावधीत मतदार नोंदणी, अद्यावतीकरण व शुद्धीकरण करण्यात येत आहे. १८ वर्षे पूर्ण झालेले नवमतदार तसेच दुर्गम भागातील नागरिकांपर्यत पोहोचून मतदार नोंदणी करण्यासाठी विशेष मोहिम राबविली जात आहे. मोहिमेंतर्गत रविवार दि. २६ नोव्हेंबर, शनिवार दि. २ डिसेंबर व रविवार दि. ३ डिसेंबर रोजी प्रत्येक मतदान केंद्रावर सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला व दिव्यांग व्यक्ती यांच्यासाठी विशेष शिबिरे राबवली जाणार आहेत. सन २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये मताधिकार बजावण्यासाठी ही महत्त्वाची संधी असल्याने पात्र नवमतदारांनी नाव नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

प्रारूप यादीत आपल्या नावाबाबत खात्री करणे आवश्यक आहे. बरेचदा मतदानाच्या दिवशी आपले नाव मतदार यादीत नाही, अशी तक्रार अनेक मतदारांकडून केली जाते. यासाठी आपले नाव, पत्ता, लिंग, जन्मदिनांक, वय, ओळखपत्र क्रमांक, मतदारसंघ इत्यादी तपशील अचूक आहे का, याची खात्री करणे आवश्यक असून या मोहिम कालावधीत मतदारांनी नाव नोंदणी व दुरुस्त्या करून घ्यावे. विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत नवीन अर्हता दिनांकावर आगाऊ मतदार नोंदणी करण्यात येते आहे. त्याप्रमाणे एखाद्याच्या नावासंबधी हरकतही तसेच मतदार यादीत दिलेल्या पत्यावर राहत नसेल, तर अशा नावाबाबत त्याच मतदारसंघातील अन्य मतदार आक्षेप घेऊ शकतात. त्यामध्ये जर तथ्य आढळून आले तर पडताळणी करून संबंधित मतदाराच्या नावाची वगळणी केली जाईल. प्रत्येक बीएलओ यांनी घरोघरी जाऊन सर्वेक्षण केलेले आहे. मतदार नोंदणीकरीता विविध माध्यमाव्दारे जनजागृती करण्यात येत आहे. अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त भटक्या जमाती, सेस्कवर्कर, थर्ड जेन्डर, दिव्यांग मतदारांसाठी तसेच नवमतदारांसाठी आतापर्यंत १४८ शिबिरे आयोजित करण्यात येऊन त्यामध्ये ५ हजार ५८५ फॉर्म गोळा करून मतदार नोंदणी करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी दिली. दि. ५ जानेवारी २०२३ च्या अंतिम मतदार यादीमध्ये पुरूष मतदारसंख्या १२ लक्ष ३८ हजार ०४४, स्त्री मतदार संख्या ११ लक्ष ६२ हजार ५३६ व तृतीयपंथी ८२, सर्व्हिस व्होटर ३ हजार २८९ असे एकुण २४ लक्ष ६६२ होती. तर दि. २७ ऑक्टोबर २०२३ रोजी प्रकाशित झालेल्या प्रारूप मतदार यादीतील पुरूष मतदार संख्या १२ लक्ष ३३ हजार ३७८ आहे. स्त्री मतदारांची संख्या ११ लक्ष ५९ हजार १५७ तर तृतीयपंथी ८२, सर्व्हिस व्होटर ३ हजार २८९ असे एकूण मतदार संख्या २३ लक्ष ९२ हजार ६१७ आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये एकूण २ हजार ६६४ मतदान केंद्रे आहेत. नवमतदार व ज्यांचे नाव मतदार यादीत नाही, अशा सर्व पात्र मतदारांनी मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करावी. यासाठी व्होटर हेल्पलाईन प किंवा voters.eci.gov.in व ceo.maharashtra.gov.in चा वापर करावा किंवा जवळचे मतदान केंद्रावर बीएलओकडे जाऊन नमुना ६ चा अर्ज भरावा किंवा संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन श्री. कटियार यांनी केले आहे.

# अमरावती मनपा हद्दीत घर टॅक्स वाढवू नये

## आ.रवी राणा राणांच्या वतीने पालकमंत्र्यांना निवेदन

**दि२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती शहरांमध्ये मनपा हद्द अमरावती, बडनेरा शहरात घर टॅक्स वाढवू नये यासंबंधी नागरिकांची मागणी असल्याने या संबंधी आपल्याकडून आदेश होण्याबाबत चे निवेदन आमदार रवि राणा यांच्या वतीने त्यांचे कार्यालय सचिव उमेश ढोणे यांनी पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडे सादर करण्यात आले पालकमंत्री म.न.पा.चा आढावा बैठक घेण्यासाठी आले असता यावेळी निवेदन दिले. अमरावती शहरातील नागरिकांची घर टॅक्स वाढवू नये यासंबंधी मागणी लक्षात घेता म.न.पा. आयुक्त यांच्या दालनातदिनांक ३१/०७/२०२३रोजी आपण वरील विषयासंबंधी आढावा बैठक



घेऊन आमदार रवी राणा यांनी आयुक्तांना व संबधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले होते.कोरोणा नंतरचा काळ बघता नागरिकांची आर्थिकस्थिती अतिशय खालावली आहे.अनेक लोकांचे छोटे.मोठे व्यवसाय, उद्योगधंदे बंद पडले.अशा परिस्थितीमध्ये महानगरपालिका अमरावती यांनी घर टॅक्स वाढविले आहे त्यामुळे शहरातील नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे.निवेदनातून पालकमंत्री यांना विनंती केली की अमरावती शहरांमध्ये घर टॅक्स वाढवू नये यासंबंधी नागरिकांची मागणी असल्याने यासंबंधी आपल्या आपल्या कडून आदेश देण्यात यावे. अशी मागणी वरील निवेदनाद्वारे करण्यात आली आमदार रवि राणा यांचे वतिने उमेश ढोणे यांनी केली यावेळी त्यांच्यासह युवा स्वाभिमान पक्षाचे सचिन भेंडे ,विनोद गुहे, आशिष गावंडे,अजय बोबडे, पवन हिंगणे,शुभम उंबरकर यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# तुरीला १२ हजार रुपयांवर भाव; पण शेतकऱ्यांच्या पदरात काय?

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिल्ह्यात अल्पमुदतीच्या नवीन तुरीचे उत्पादन शेतकऱ्यांच्या हाती येणास आणखी महिना ते दीड महिन्याचा कालावधी शिल्लक आहे. अशातच सध्या खुल्या बाजारात तुरीचे दर १० हजारांवर गेले आहेत. परंतु सध्या शेतकऱ्यांकडे तूर शिल्लक नसल्यान बाजारात तुरीचे दर वाढूनही काहीही उपयोग होत नसल्याचे चित्र आहे.

शेतकरी पावसाळ्यापूर्वी तुरीची लागवड करतात. संपूर्ण खरीप व रब्बी हंगाम उलटल्यानंतर तुरीचे पीकशेतकऱ्यांच्या हाती येते. जुलै महिन्यात लागवड केलेली तूर दुसऱ्या वर्षीच्या जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यात शेतकऱ्यांच्या हाती येते. हलक्या प्रतीची म्हणजेच अल्पमुदतीची तूर असल्यास डिसेंबर महिन्यातच शेतकऱ्यांच्या पदरी पडते. सध्या शेतकऱ्यांकडे जुनी तूर शिल्लक नाही. तसेच नवीन तूर हाती येण्यास दोन महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे.

### नवीन तुरीला दर मिळणार काय?

दोन महिन्यानंतर नवीन तुरीचे उत्पादन शेतकऱ्यांच्या हाती येईल. नवीन तुरीला खुल्या बाजारात चांगला दर मिरणार काय, असा सवाल शेतकऱ्यांकडून विचारला जात आहे. विशेष म्हणजे, नवीन तूर शेतकऱ्यांच्या हाती आली की दर पाडले जातात.

### हमीभाव किती?

केंद्र शासनाच्या आधारभूत किमत योजनेंतर्गत २०२३-२४ या वर्षांत तुरीला ७ हजार रुपये हमीभाव जाहीर करण्यात आला आहे. परंतु खुल्या बाजारात तुरीला याहून अधिक भाव दिला जातो. त्यामुळे अनेक शेतकरी हमीभाव केंद्रापेक्षा खुल्या बाजारात तुरीची विक्री करतात.

# वंचित मविआ सोबत आली पाहिजे : आ. यशोमती ठाकूर

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताकअमरावती**



मुंबईत वंचित बहुजन आघाडीचा आज संविधान सन्मान मेळावा होतं आहे. यामध्ये काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले उपस्थित राहणार आहे सर वंचित महाविकास आघाडीत सामील होणार असल्याच्या पुन्हा एकदा चर्चा सुरू झाल्या. आमदार यशोमती ठाकूर यांनी प्रतिक्रिया दिली. वंचित बहुजन आघाडी सोबत असली पाहिजे. महाराष्ट्र पुरोगामी आहे ते सगळं जपण्यास मदत होईल तर वंचितचे प्रकाश आंबेडकर लोकसभा सभागृहात असले पाहिजे असं मत यशोमती ठाकुर यांनी मांड. तर संविधान दिनापासून घर घर संविधान अभियान राबविण्यात येणार असून प्रत्येक घरात संविधान वाटप करू. उद्या पासून हे अभियान राबविण्यात येणार आहे. असं यशोमती ठाकूर म्हणाल्या.

# रब्बी हंगामातील पिकांसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत पाणी अर्ज सादर करावे

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

रब्बी हंगाम सन २०२३-२४ मध्ये बागायतदार शेतकऱ्यांनी सिंचनाचा लाभ घेण्यासाठी पाणी मागणी अर्ज संबंधित शाखा अधिकारी यांच्या कार्यालयात अथवा कालवा निरीक्षक अथवा मोजणीदार यांच्याकडे ३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत सादर करण्याचे आवाहन अमरावती मध्यम प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता सु.पां. आडे यांनी केले आहे.

अमरावती मध्यम प्रकल्प विभागातील उपलब्ध पाणी पुरवठ्यानुसार रब्बी हंगामासाठी पाणी पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यानुसार शेतकऱ्यांनी आपले पाणी मागणी अर्ज नमुना ७ दोन प्रतीमध्ये विहित कालावधीमध्ये सादर करावा. पाणी मागणी अर्जाचे कोरे नमुने संबंधित उपविभाग शाखा कार्यालय व उपशाखा कार्यालयातून मोफत पुरविण्यात येत आहेत.

शासनाच्या धोरणानुसार धरणातील उपलब्ध पाणी हे उन्हाळा हंगामाअखेर पुरवावे लागणार असल्याने प्रथम पिण्याच्या पाण्याची गरज भागवून उर्वरित पाण्यात शेती पिकासाठी व औद्योगिक कारखाने यांना पुरविण्याचे नियोजन आहे. उभ्या पिकांना पाणी घेतांना शेतकऱ्यांनी काटकसरीने पाणी घ्यावे व सुक्ष्म सिंचनावर भर द्यावा, असे अमरावती मध्यम प्रकल्प विभागामार्फत



कळविण्यात आले आहे.

**पाणी मागणी अर्ज करण्यासंबंधी सूचना**

पाणी मागणी अर्ज करणारा स्वत: शेताचा मालक असावा. कुळ अगर वहीवाटदार असलेल्या शेतीसाठी मागणी अर्जासोबत मालकाचे संमतीपत्र जोडावे. अर्जामध्ये मागणी क्षेत्र पिकवार स्पष्ट नमूद करावे. अर्जावर खातेपुस्तिकेवरुन गाव, सर्वे क्रमांक, पोटहिस्से पिकाचे नाव आणि मागणीक्षेत्र अचूक नोंदवावे. अर्जात पाणीपट्टी, थकबाकीसंबंधी अचूक माहिती द्यावी. अर्जाची पूर्तता कालवा निरीक्षकाकडून तपासून दोन प्रतीत सादर करावे. पाटबंधारे प्रकल्पाच्या कालव्यातून रब्बी हंगामामध्ये ३१ मार्च २०२४ पर्यंत पाणीपुरवठा करण्यात येईल. प्रकल्पामध्ये पाणीसाठा उपलब्ध असल्यास इच्छुक शेतकऱ्यांना १५ एप्रिल २०२४ पर्यंत त्यांच्या मागणी अर्जानुसार पाणीपुरवठा करण्यात येईल.

प्रथम पाणी दिल्यानंतर सिंचन केलेल्या पीक क्षेत्राची मोजणी सिंचन शाखेच्या मोजणीदाराकडून करण्यात येईल. शेतकऱ्याच्या शेतातील पाटचारी/शेतचारी सुस्थितीत नसल्यास अशा शेतकऱ्यांचा पाणी अर्ज मंजूर करण्यात येणार नाही. अर्ज मंजूर होताच कालवा निरीक्षकाकडून पाणीपुरवठा संबंधीची माहिती ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर लावण्यात येईल. कडधान्ये, डाळी, तेलबिया, रब्बी भुसार पिके यांच्यासाठी प्राधान्यक्रमाने पाणीसाठ्याच्या उपलब्धतेनुसार पाणी पुरवठा करण्यात येईल. रब्बी हंगामासाठी अमरावती मध्यम प्रकल्प विभागांतर्गत मध्यम प्रकल्प, लघू प्रकल्प, उपसा सिंचन योजना इत्यादी पाठबंधारे प्रकल्पांच्या समादेश क्षेत्रात असलेल्या शेतकऱ्यांनी याची नोंद घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.